# योहानाचे पहिले पत्र

1 John | with Study Notes

# योहानाचे पहिले पत्र - स्टडी

## 1

[1]जे युगानुयुग* होते, ज्यांना आम्ही* ऐकले, आपल्या डोळयांनी पाहिलेव निरखून पाहिले, आपल्या हातांनी स्पर्शले*, त्याच
जीवनाच्या वचनाविषयी*. [2]*कारण जीवन प्रगटले, आम्ही ते पाहिले देखील आणि साक्ष देतो, आणि तेच अनंत जीवन* जे
पित्याबरोबर* होते आणि आम्हावरही प्रगट झाले, त्याची तुमच्यासमोर आम्ही घोषणाही करतो आहोत. [3]*त्यांना आम्ही पाहिले -
ऐकले आणि त्याविषयीच बोलतो आहोत, जेणेकरून तुम्हीही आमच्याबरोबर संगत* (सहभागिता) करावी. खरोखरीच, आपली
सहभागिता पिता व पुत्र येशू ख्रिस्तांबरोबर आहे. [4]याविषयी आम्ही याकरताच लिहितो की तुम्ही आनंदाने* परिपूर्ण होऊन जावे.
[5]जी वार्ता आम्हाला येशूंपासून मिळाली व जी आम्ही तुम्हांला सांगतो आहोत, ती ही की परमेश्वर प्रकाश आहे* आणि त्याच्याठायी

---

***1:1** *“युगानुयुग”*- उत्प 1:1; योहान 1:1.

**“आम्ही”*- योहान ख्रिस्तांच्या त्या सर्व शिष्यांना संबोधत आहे जे प्रारंभी निवडण्यात आले होते. ज्या समयी येशू या पृथ्वीवर होते, त्या समयी वैयक्तिकरीतिने, त्या शिष्यांनी येशूंचे शिक्षण ऐकलेले होते आणि जे काही त्यांनी केले, ते पाहिलेले होते. तुलना 2 पेत्र 1:16; योहान 15:27; प्रेषि 4:20.

**“स्पर्शले”*- पाहा लूक 24:39; योहान 20:27.ही येशूंच्या पुनरूत्थानंतरची बाब आहे.

**“जीवनाच्या वचनाविषयी”*- येशू स्वतः ते ‘वचन’ (शब्द) आहे, जे मानवजातीकरता आहे. ते वचन अनंत जीवन आहे (5:20; योहान 1:4; 5:26; 14:6). येशू लोकांना सार्वकालिक जीवन बहाल करावयास आले होते (योहान 10:10; 6:51). येशूंचा संदेश लोकांमध्ये एका नवीन जीवनाचा प्रारंभ करतो (रोम 5:21; 6:23).

***1:2** पाहिले - अनंत जीवन किंवा सार्वकालिक जीवन, येशू ख्रिस्तांच्या आगमनानंतरच शक्य होते (योहान 1:14; 2 तीम 1:10).

**“अनंत जीवन”*- 5:11-12; योहान 3:16.

**“पित्याबरोबर”*- योहान 1:2; 17:5.येशू पित्याबरोबर होते, ‘त्रिएक परमेश्वराच्या’ समूहात नोट्स - योहान 17:1,5; 1 करिं 8:5-6; 2 योहान 3.

***1:3** आपण पाहिलेच आहे, की तीन वचनात, येथे योहान तिसऱ्यांदा असे म्हणतो आहे. त्याने भर देऊन सांगितले की त्यांनी आणि इतर प्रेषितांनी इकडच्यातिकडच्या सूचना मिळवल्या नाहीत, कहाण्या किंवा घटना एकत्र/संग्रहीत केल्या नाहीत, त्यांनी कल्पनांचे टोले मारून त्यांचा स्वतःचा संदेश (वचन) लोकांपर्यंत पोहचवला नाहीये; याउलट, जे काही येशूंचे शिष्य बोलून अंगिकारत होते, त्याविषयी त्यांना खात्रीने, उत्तम प्रकारे जाण होती, ज्ञान होते.

**“संगत/सहभागिता”*- प्रेषि 2:42; 1 करिं 1:9; 2 करिं 13:14; फिलि 3:10.या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे ‘मिळून-वाटून’ राहणे-खाणे. येशूंचे सत्य प्रस्तुत करण्यासाठीचे सबळ प्रमाण योहानाजवळ होते. याठिकाणी पहिले ठोस व प्रबळ प्रमाण हेच आहे. इतर दुसरी वचनें - 4,2:1; 12:14,21; 5:13 ही होत. पिता व पुत्राबरोबर, त्रिएक समूहात योहान, या दोन व्यक्तिंना वेगळे असे बघतो (मत्त 3:16-17यात त्रिएकत्वावरचे नोट्स) परंतु अद्‌भुत गोष्ट ही आहे की हे तिघेही इतक्या घनिष्ट प्रकारे एकतेत बांधलेले आहेत, की एकाबरोबरची सहभागिता, दुसऱ्या दोघांबरोबर देखील कायम आहे.‘येशू-परमेश्वर’ - इतर वचनें फिलि 2:6; लूक 2:1ही आहे. परमेश्वराबरोबर सहभागिता म्हणजे परमेश्वराला जाणून व समजून घेणे अर्थात ओळखणे (योहान 17:3); तसेच या पृथ्वीवर वास्तव्य करतांना परमेश्वराच्या आनंदात समाविष्ट होणे, एकरूप होणे, त्याची शांति जवळून ओळखणे आणि त्याचे शुद्ध-पवित्र विचार व कार्य यात सहकारी होऊन सहकार्य करणे हेच होय. जे लोक येशूंचे स्वामीत्व (प्रभूत्व) स्वीकार करतात तेच खरे पाहता, परमेश्वराला ओळखतात आणि त्याच्याबरोबर संबंध कायम ठेवतात. जे लोक असे नाहीत त्यांना ‘आत्म्याद्वारे दिले जाणारे जीवन’ काय असते, कसे असते याविषयीचे ज्ञान नाहीये (5:11-12).

***1:4** *“आनंदाने”*- लूक 2:10; योहान 15:11; 16:22,24; 17:13; रोम 14:17; गल 5:22.जर, सत्य आपल्या जीवनात मान्य करून तसा व्यवहार केला तरच आनंद मिळू शकतो. म्हणूनच जे सत्य योहानाने येशूंपासून मिळवले होते, त्याच सत्याविषयीचे शिक्षण तो त्या लोकांना शिकवतो आहे. ख्रिस्तांचे संपूर्ण सत्य व त्या सत्याप्रत जुळलेले आज्ञापालन याचाच अर्थ आहे 'आनंदाने परिपूर्ण होणे.'

***1:5** *“परमेश्वर प्रकाश आहे”*- भौतिक नव्हे आंतरिक. बायबलमध्ये अंधार म्हणजे अपराध-गुन्हा, आंतरिक अज्ञान, पण प्रकाश पवित्रतेकडे व सत्याकडे इशारा करतो. मत्त 4:16; लूक 2:32; योहान 1:45; 3:19-20; 8:12; 11:10; 12:36,46; प्रेषि 26:18; रोम 13:12; 2 करिं 4:4,6; इफि 5:8-9,13-14; 1 तीम 6:16.

कोणत्याही प्रकारचा अंधार नाहीच* मुळी. [6]जर आपण म्हटले* की आपली सहभागिता त्याच्याबरोबर आहे आणि अंधारमय जीवन जगत असलो, तर आपण खोटे* आहोत आणि सत्य-सात्विक जीवन* जगत नाहीये. [7] *जर आपण प्रकाशमय जीवन जगत आहोत, तर जसा तो स्वतः प्रकाशमय आहे, तशीच एकमेकांबरोबर आपली सहभागिता* आहे आणि परमेश्वराचा पुत्र येशू ख्रिस्त याचे रक्त*, आपल्याला आपल्या सर्व अपराधांपासून स्वच्छ करते. [8] *जर आपण म्हटले की आपल्याठायी अपराध नाहीये, तर आपण स्वतःला धोका देतो आणि आपल्या जीवनात सत्य नाहीये*. [9]जर आपण* आपले अपराध कबूल (मान्य) केले, तर येशू

---

* *"अंधार नाहीच"*- या जगात भरपूर दुष्टाई व वाईटपणा भरलेला आहे, परंतु परमेश्वराठायी तसे नाही. परमेश्वराने कोणत्याही प्रकारच्या दुष्टाईची निर्मिती केलेली नाही आणि तो वाईटाच्या पक्षाचाही नाही. परमेश्वर संपूर्णरित्या पवित्र व शुद्ध आहे (लेवी 20:7; यश 6:3).

***1:6** *"जर आपण म्हटले"*- अपराध करत राहणे, त्रृटीत स्थिर राहाणे आणि तरीही पवित्रता व सत्याची साथ आहे असे म्हणणे अशक्य आहे. अपराधाची निवड म्हणजे परमेश्वराचा त्याग - जर आपण परमेश्वराचाच त्याग केलेला असेल तर त्याच्याबरोबर आणखी दुसऱ्या बाबीविषयी भागीदार कसे होऊ शकतो? पाहा 2 करिं 6:14.दुःखाची गोष्ट हीच आहे की सर्व लोक जरी असा दावा करतात, की ते परमेश्वराला ओळखतात परंतु वास्तविकता तशी नाही, खरोखरच ते परमेश्वराला ओळखत नाहीत. त्यांचे जीवन त्यांचा व्यवहार पाहूनच कळते ,की त्यांनी परमेश्वराला ओळखलेले नाहीच मुळी.

* *"खोटे"*- अशा प्रकारचे लोक एकतर स्वतः धोक्यात आहेत, नाहीतर ते दुसऱ्यांना धोका देण्याचा प्रयत्न करत आहे हे नक्कीच. त्यांचे दावे प्रत्येक प्रकारे रिकामे व फुसके आहेत.

* *"सत्य-सात्विक जीवन"*- ज्ञान ऐकून किंवा वाचून ते प्राप्त करणे पुरेसे नाहीये, प्रियांनो आपल्याला त्याचा सराव करावयाचा आहे, अभ्यास करावयाचा आहे.

***1:7** प्रकाशात जगणे म्हणजे काय? आपल्या पूर्ण पत्रात योहान याविषयीच शिकवतो आहे. याचा सोपा अर्थ आहे : प्रकाशात असणे - जे अंधाराच्या अगदी विरूद्ध आहे. अंधार म्हणजे अपराध-गुन्हा-अज्ञान व त्रुटि होय. 'प्रकाशात जगणे' किंवा असणे म्हणजे सर्व काही (अपराध) जे परमेश्वराच्या इच्छेविरूद्ध आहे त्याकडे पाठ वळवणे आणि जे करावयाचे म्हणजे 'प्रभूच्या इच्छेनुरूप आहे तेच करणे होय'. प्रकाशात राहणे म्हणजे परमेश्वराप्रत उघड उघड व्यवहार, आपण जे आहोत आणि जे काही करतो, त्या सर्वांपासून स्वतःला न लपवणे होय. जर आपल्याला पारदर्शक जीवन जगावयाचे असेल तर आधी स्वतः आपल्याला प्रकाश हवाहवासा वाटणे आवश्यक आहे. आपल्याला प्रकाशात आणणे हे परमेश्वराचेच कार्य आहे मनुष्याचे नव्हे - 2 करिं 4:6; 1 पेत्र 2:9; कल 1:12-13.प्रकाशाच्या परिसीमेत (क्षेत्रात) असल्यामुळे आपली वागणूक व व्यवहार देखील तसाच असावा - 2:6.

* *"सहभागिता"*- खरी ख्रिस्ती सहभागिता तेव्हाच शक्य होते किंवा होऊ शकते जेव्हा विश्वासी लोक पारदर्शक जीवन जगतील. गुन्हा व त्रुटि, आपले आपसातील संबंध बिघडवतील.

* *"येशू ......रक्त"*- विश्वासी प्रत्येक दिवशी आपल्या विचारात, शब्दात व कार्यात कमी पडत असतात. (2:1; याकोब 3:2; गल 2:11-13; 5:17; रोम 7:18; 1 राजे 8:46). जर ते परमेश्वराच्या प्रकाशात जीवन जगतील तर त्यांचे गुन्हें क्षमा केले जातील, त्यांना शुद्धपणा प्राप्त होईल. हे सर्व काही केवळ क्रूसावरील बलिदानामुळेच आहे (2:2). शुद्धतेचे कार्य चालूच असते.

***1:8** जर येशूंचे रक्त आपल्याला, आपल्या सर्व अपराधांपासून शुद्ध करते, याचा अर्थ, आपण अपराधी नाही किंवा गुन्हेगार नाही असा आहे काय? नाही, म्हणूनच लगेच योहान म्हणतो की या पृथ्वीवर कोणीही निष्कलंक नाहीये. पौल जो स्वतः महान प्रेषित होता त्याचे कथन होते, की अपराध त्याच्या आत आहेच, रोम 7:17;इतर वचनें - मत्त 7:11; रोम 7:14-15; गल 5:16-17; 1 तीम 1:15; याकोब 3:2.आपल्यापैकी एकही जण, या जगात, त्या स्थानापर्यंत पोहंचू शकत नाही, जेथे आपल्याला अपराध मान्य करण्याची गरजच भासणार नाही आणि शुद्धताही, जी केवळ येशूंच्याद्वारेच आहे (मत्त 6:12). जर आपल्यापैकी कोणालाही असे वाटत असले की आपल्या आतील अपराधाचा स्वभाव समूळ संपलेला किंवा काढण्यात आलेला आहे, तर आपण स्वतःला आपल्या स्वतःपासून दूर घेऊन जाणारे होऊ. त्याचा अर्थ जे खरे नाही, अशा कशावर तरी आपण विश्वास करतो आहोत. आपण त्याविषयी जबाबदार असू आणि अपराधी सुद्धा. हा आपला विचार आहे की आपण अपराधी नाही, अपराधाशिवाय आहोत, परमेश्वराचा तसा विचार नाहीच मुळी.

* *"सत्य नाहीये"*- इतर अनेक सत्य आपल्या जीवनात असू शकतात परंतु जर आपल्याला वाटते की आपला स्वभाव अपराधाशिवाय आहे तर अपराधाविषयीचे सत्य व त्यापासून शुद्ध होण्याविषयीचे सत्य, आपल्या ठायी नाहीये. जर असे आहे तर आपण अपराधाला दुसरे नांव देऊन ते हलके-कमी महत्वाचे समजत आहोत आणि सत्याचा सामना न करणारे होत जात आहोत. अशा प्रकारेच लबाडी व खोटारडेपणा आपल्या जीवनात समावतो. सर्व विश्वासींनी सिद्धतेकडे (च्या दिशेने) वाढत जावे, परंतु

आपल्याला क्षमा करण्याविषयी विश्वासयोग्य* व प्रामाणिक* आहेत आणि ते आपली मलीनता पूर्ण प्रकारे स्वच्छ* करतात. [10] *जर आपण म्हटले की आपल्याठायी काही अपराध नाहीये, तर आपण येशूंना खोटे ठरवत आहोत आणि त्यांचे वचन आपल्यात नाहीये.

## 2

[1] माझ्या मुलांनो*, तुम्ही कोणत्याही बाबतीत अपराधांत पडू नये म्हणून मी तुम्हांला त्याविषयी लिहितो आहे. पण जर कोणी अपराधांत पडला तर आपल्याजवळ नीतिमान येशू ख्रिस्त, पित्यासह एक निष्कलंक** वकील* आहेत. [2] स्वतः येशूच आपल्या

---

सर्वांनाच सिद्धता प्राप्त होत नाही. फिलि 3:12.पण विश्वासी असल्यामुळे, आपले ध्येय व लक्ष्य अपराधाशिवाय जगण्याचे तर असावेच (2:1). जाणूनबुजून नसले तरी नकळत आपल्या हातून वाईट घडते. जो नकळत करतो तो अपराध करण्यापासून वाचतो, परंतु जे आपण करावयास हवे, ते न केल्यामुळेही आपण गुन्हेगारच ठरतो किंवा अपराध करतो (पाहा गण 32:23चे नोट्स व मत्त 25:42-43). नकळत केलेली वाईट कृत्यें देखील अपराधच आहेत (लेवी 4:1-2). आपण जे करावयास हवे ते करण्यात अपयशी होतच नाही, असे आपल्यापैकी कोण म्हणू शकतो?

*__1:9__ *“आपण”*- योहान, येशूंचा प्रभु म्हणून स्वीकार करणाऱ्यांना लिहितो आहे (2:1,12-14), त्यात तो स्वतःचाही समावेश करतो. त्याला ठाऊक होते की प्रत्येक मनुष्याला आपले अपराध स्वीकार करण्याची गरज आहे; मत्त 6:12; लूक 11:4.“कबूल”, या ग्रीक शब्दाचा अर्थ आहे, दुसरा मनुष्य जे काही सांगतो ती कबूल करणे की ‘होय, एखादा आरोप बरोबर आहे.’ “कबूल करणे”. म्हणजे, जे काही परमेश्वर एखाद्याविषयी म्हणतो, ते मान्य (स्वीकार) करणे होय. गुन्हा किंवा अपराध याच्याऐवजी आपण ‘कमजोरी’ ‘दुर्बलता’ किंवा ‘चूक’ या शब्दांचा उपयोग करू नये. प्रियांनो विचार असोत, की शब्द आणि कृत्यें ते जे परमेश्वराच्या सिद्ध इच्छेविरूद्ध आहे (परमेश्वर व मनुष्याकरता प्रेमाविरूद्ध) आणि जे चालूच (कायम) ठेवले जाते ते म्हणजे अपराध आहे. तसेच, जे केले जावे आणि केले जात नाही, तो देखील अपराध आहे (याकोब 4:17; मत्त 25:41-46; 1 शमु 12:23). अपराध केल्यामुळे आपण दोषी ठरवले जातो आणि मग आपल्याला क्षमेची गरज भासते. म्हणून आपण नम्र अंतःकरणाने प्रभु-परमेश्वराशी सहमत व्हावे आणि क्षमादानासाठी स्वतःला तयार करावे, क्षमेची गरज आहे हे कबूल करावे. अपराधांचा अंगिकार आणि पारदर्शकता (प्रकाशात चालणे) ही दोन्ही सोबत सोबतच असावीत. परमेश्वरी प्रकाश आपल्या अपराधांचा खुलासा करतो (इफि 5:13-14). खुलासा झाला, स्पष्ट झाले, की आपण आपले अपराध मान्य करून ते सोडावयास हवेत.

* *“विश्वासयोग्य”*- स्तो 33:4; 111:7-8; 145:13; 146:6; 1 करिं 1:9; 2 तीम 2:13; इब्री 10:23; 11:11; 1 पेत्र 4:19.परमेश्वर युगानुयुग (सदैव) आपल्या वचनांप्रत (म्हटलेले शब्द), तारणाऱ्या योजनेप्रत व आपल्या स्वतःच्या स्वभावाप्रत प्रामाणिक व विश्वसनीय आहे. परमेश्वर क्षमा करणारा आहे. निर्ग 34:7; गण 14:18; नहेम्या 9:17; स्तो 86:5; 99:8; 103:3; दानी 9:9; मीखा 7:18; मत्त 6:12; 9:2; रोम 4:7-8; इब्री 8:12; याकोब 5:15.बायबल स्पष्ट व ठळकपणे दर्शवते की लोकांचे अपराध क्षमा करण्याकरता येशू जगात आले जेणेकरून अपराधांकरताचे बलिदान पूर्ण व्हावे - योहान 1:29; 3:14-16.म्हणून जर आपण मन बदलले आणि शुद्धतेची इच्छा बाळगली तर खात्रीने ती आपल्याला मिळेलच.

* *“प्रामाणिक”*- अनु 32:4; स्तो 9:16; 36:6; 89:14; 111:7.न्यायाच्या आधारे ते क्षमादान देतील. येशू ख्रिस्तांनी सर्व चुकते केलेले आहे, खंडणी दिली आहे, आपल्या अपराधासाठी दंड सहन केलेला आहे. 2:2; रोम 3:25-26.

* *“स्वच्छ”*- वचन 7. प्रभु अपराध क्षमा करतो, नेहमीकरता ती समाप्त करतो, आपला विवेक स्वच्छ धुतो - इब्री 9:14

*__1:10__ वचन 8. वर्तमानासंबंधी आहे, परंतु वचन 10 जुन्या समयाविषयीचे आहे. बायबलनुसार, सर्वांनी अपराध केले (रोम 3:9-23). जर आपण म्हटले की आम्ही केले नाही तर आपण बायबल खोटे ठरवतो.

*__2:1__ *“माझ्या मुलांनो”*- त्याने त्यांना आपली आंतरिक मुले, असे म्हटले - तुलना 1 तीम 1:2जेणेकरून तुम्ही अपराधात पडू नये - हेच आपले लक्ष्य आहे. तेच ध्येय आपण पुढे ठेवावे. हा शब्द सर्व विश्वासींकरता एक मोठी संधी उपलबध करून देतो. आपल्या आत वाईट स्वभाव आहे (1:8) तरीही. आपण परमेश्वराची कृपा व पवित्र आत्म्याच्या साहाय्याने त्यावर (वाईट स्वभाव) विजय मिळवू शकतो. आपण जाणूनबुजून ते गमावण्याची व प्रलोभनांत (परीक्षा) फसण्याची गरज नाहीये. तुलना करा (1 करिं 10:1; 2 करिं 7:11). मूळचा वाईट स्वभाव आहे म्हणजे असा अर्थ नाहीये, की ख्रिस्ती लोकांनी चुका करत राहावे. चुका टाळता येतात, कारण परमेश्वराने त्यांच्या आत एक नवीन स्वभाव सुद्धा राखलेला आहे (इफि 4:24). हे सुद्धा खरे (सत्य) आहे की परमेश्वराचा आत्मा त्यांच्या आत निवास करतो (1 करिं 6:19).

* *“निष्कलंक”*- प्रेषि 3:14; 7:52; 22:14.ते एक असे वकील आहे जे संपूर्ण न्यायासह आपल्या पक्षात बोलतात , परमेश्वर

अपराधांकरता प्रायश्चित* आहेत, केवळ आपल्यासाठीच नव्हे तर संपूर्ण जगाच्या लोकांच्या अपराधांकरताही* आहेत. [3]जर
आपण त्यांच्या आज्ञा पाळल्या*, तर त्यावरून आपल्याला कळते की* आपण येशूंना ओळखतो. [4]जो म्हणतो, की "मी येशूंना
ओळखले आहे आणि त्यांच्या आज्ञा पाळत नाही तर तो खोटा* आहे व त्याच्या आत सत्य नाहीये." [5]पण जो त्यांची आज्ञा मानतो,
त्याच्याठायीच परमेश्वराचे प्रेम* सिद्धत्वास (झाले) पोहचले आहे, त्यावरून आपल्याला कळते की आपण येशूंठायी आहोत. [6]जो

---

आपल्यावर अनंतकालिक प्रेम करतो; ज्याने असा निर्धार केलेला आहे की तो आपल्याला आपल्या प्रत्येक अपराधापासून सोडवेल. त्याच्या यशाविषयी आपण शंका बाळगू शकतो काय?

* *"निष्कलंक"*- प्रेषि 3:14; 7:52; 22:14;आपल्याशी व्यवहार करतांना किंवा वकील, मध्यस्थ आणि बचाव करणारे म्हणून ते असे काहीही करणार नाहीत जे त्यांच्या परिपूर्ण न्यायाविरूद्ध आणि नीतिमत्तेविरूद्ध आहे. ते नीतिमत्वाने विश्वासींचा बचाव पक्ष मांडू शकतात, त्यांच्या अपराधाविषयी त्यांना योग्य न्याय मिळवून देऊ शकतात. त्याचे कारण हेच आहे, की त्यांनी त्यांचे अपराध स्वतःच्या बलिदानाद्वारे हरण केलेले आहेत, स्वतःच्या बलिदानामुळे विश्वासींची अपराध त्यांनी स्वतःवर लादून घेतले आहेत.

* *"वकील"*- पाहा रोम 8:34; 1 तीम 2:5; इब्री 7:25; रोम 5:9-10.येशू आपले स्वर्गीक वकील आहेत. जेव्हा विश्वासी अपराध करतो, तेव्हा येशू त्याच्या पक्षाचे होतात आणि पित्यासमोर त्याची बाजू मांडतात. सैतान प्रत्येक समयी आपल्यावर आरोप लावत असतो, (प्रकटी 12:10) येशू आपल्याला आरोपातून सोडवतात. जर एक विश्वासी अपराध करतो, तर त्याचा नाश होतो काय? त्याचे तारण गमावले जाते काय? त्याच्यासाठी आशा नाहीये काय? प्रियांनो, हे बायबलचे शिक्षण नाहीये - 1:9. प्रियांनो, जर त्याच्या बाजूने त्याचा पक्ष घेऊन कोणी, त्याला सोडवणारा 'असा वकील' आहे तर त्याचा कसा नाश होऊ शकतो? तो आपला उद्धार कसा गमवू शकतो?

***2:2*** *"प्रायश्चित"*- लोकांचे अपराध स्वतःवर घेऊन, ख्रिस्तांनी परमेश्वराचा क्रोध शांत केलेला आहे - बायबलमध्ये या शब्दाचा असाच अर्थ आहे - पाहा रोम 3:25; इब्री 2:17; मत्त 26:28; योहान 3:14-15; 1 करिं 15:3; 2 करिं 5:19,21; गल 1:4; इफि 1:7; इब्री 9:12,18; 1 पेत्र 2:24; 3:18.

* *"संपूर्ण...अपराधांकरताही"*- 4:14; योहान 1:29; 2 करिं 5:14; 1 तीम 2:6; इब्री 2:9.लोकांचा उद्धार याकरता झालेला नाहीये, कारण ख्रिस्त त्यांच्याकरता बलिदान झाले नाहीत, लोक याकरता भटकलेले आहेत, कारण ते येशूंचे बलिदान स्वीकारत नाहीत आणि त्यावर विश्वास सुद्धा ठेवत नाहीत. प्रकाशाऐवजी त्यांना अंधार प्रिय आहे, पवित्रतेऐवजी अपराध प्रिय आहे. हाच त्यांचा दंड होय.

***2:3*** *"आज्ञा पाळल्या"*- 3:24; 5:3; मत्त 24:20; योहान 14:15,23; प्रेषि 4:19; 5:29; रोम 6:16; 16:26; इब्री 5:9.खरे विश्वासीं येशूंना तारणारा म्हणून तर ग्रहण करतातच पण ते त्यांचा आपला स्वामी म्हणूनही स्वीकार करतात. (प्रेषि 22:10नोट्स).

* *"आपल्याला ...की"*- वचन 5; 3:14,19,24; 4:13; 5:13 यांत योहान, परमेश्वराची ओळख असण्याविषयी/होण्याविषयी बोलत नाहीये, परंतु तो परमेश्वरालाच ओळखून घेण्याविषयी बोलतो आहे. या पत्रात 'ओळखणे' हा मुख्य शब्द आहे. हा सुमारे 33 वेळा आलेला आहे. या वचनात योहान त्या ज्ञानाविषयी बोलतो जे प्रमाणावर अवलंबून आहे. लोक परमेश्वराला 'आपण ओळखतो' असा विचार करत असतात, पण खरोखरीच तसे नसते. ते एखाद्या भावनात्मक किंवा विचित्र अनुभवाच्या धोक्यात अडकलेले असू शकतात, हा धोका देणारा अनुभवच आहे जो लोकांचा मार्ग चुकवतो. यिर्म 17:9; इब्री 3:13; प्रकटी 12:9.योहान या गोष्टीवर भर देतो की जोपर्यंत आपल्या जीवनाद्वारे आपण परमेश्वराला ओळखण्याचे प्रमाण देऊ शकत नाही तोपर्यंत ढोंगी होऊन, बनावटी होऊन असे वागू नये की जणू काही आपण परमेश्वराला खरोखरीच ओळखतो. परमेश्वराच्या सत्य (खऱ्या) ज्ञानाचा प्रभाव दुसऱ्यांवर होत असतो (योहान 17:3). त्यामुळे लोकांचे अंतःकरण, विचार व व्यवहार बदलतो. जर कशाही प्रकारचे परिवर्तन नसेल तर, परमेश्वराचे कोणतेही सत्य ज्ञान एखाद्याठायी नाहीये हेच सत्य आहे. असेही लोक आहे जे मोठ्या श्रेष्ठ ज्ञानाचा दावा करतात, पण ते येशूंच्या आज्ञा पाळणारे आहेत काय? जर नाही तर, हे ज्ञान व अनुभव धोक्याचे आहे आणि बेकारही. आपण परमेश्वराला ओळखतो याचे प्रमाण आहे तरी काय? आज्ञा पाळणे (3) अंतःकरणात साठवलेले प्रभूचे प्रेम (5) असे जीवन जे येशूंद्वारे दिलेल्या आदर्शानुरूप आहे (16).

***2:4*** *"खोटा"*- वचन 8; 4:20; योहान 8:44.

***2:5*** *"प्रेम"*- 4:7-8. या पत्रातील हा दुसरा मुख्य शब्द होय. खरे अस्सल प्रेम, आज्ञापालनाद्वारेच प्रगट होते. हा शब्द जवळजवळ 35 दा (नवीन करारातील सर्व पुस्तकांपैकी याच पत्रात) वापरलेला आहे. बाकी सर्व काही केवळ भावना आणि धोका आहे (योहान 14:15). अंतःकरणात पेरण्यात आलेले सत्य, केवळ प्रेम व आज्ञा पालनातच प्रगट होते.

म्हणतो, “की मी येशूंठायी आहे[*],” त्याचे जीवन तसेच असावे जसे येशूंचे होते[*]. 7 भाऊबहिणींनो, मी तुम्हांला एखादी नवी आज्ञा
सांगत नाहीये, पण तीच जुनी आज्ञा जी प्रारंभी तुम्हांला देण्यात आली होती. जुनी आज्ञा तीच, अर्थात परमेश्वराचे वचन आहे, जे
तुम्ही प्रारंभापासून ऐकले होते[*]. 8 मी पुन्हा तुम्हांला एक नवी[*] आज्ञा देतो आहे, जी येशू व तुमच्याठायी सत्य आहे, कारण अंधार
नाहीतसा होतो आहे आणि सत्य-प्रकाश आधीपासूनच चकाकतो[*] आहे. 9 [*]जो म्हणतो, "की मी प्रकाशात आहे आणि आपल्या
भावाचा[*] द्वेष करतो, तो अद्यापही अंधारात आहे. 10 जो आपल्या भावावर प्रेम करतो, त्याचे जीवन प्रकाशात आहे, कारण
त्याच्यात अडखळण्याचे कोणतेही कारण[*] नाहीये. 11 पण जो आपल्या भावाचा तिरस्कार करतो, तो अंधारात आहे आणि
अंधकारमय जीवन जगतो आहे; तो कोणत्या दिशेने[*] चालला आहे हे त्याला ठाऊकच नाहीये कारण त्या अंधाराने त्याचे डोळे
आंधळे[*] केलेले आहेत. 12 लहान बाळांनो, येशू ख्रिस्तांमुळे[*] आपले अपराध क्षमा झालेले[*] आहेत म्हणूनच मी तुम्हांला लिहितो
आहे. 13 हे बापांनो[*], जे येशू प्रारंभापासून[*] आहेत त्यांना तुम्ही ओळखलेले[*] आहे म्हणून मी तुम्हांला लिहीत आहे. तरूणांनो, मी
तुम्हांला लिहित आहे कारण तुम्ही दुष्ट सैतानावर विजय[*] मिळवलेला आहे. लहान बाळांनो, मी तुम्हांला लिहित आहे कारण तुम्ही
पित्याला ओळखलेले आहे. 14 हे बापांनो, मी तुम्हांला लिहीत आहे कारण जे प्रारंभापासून आहेत, त्यांना तुम्ही ओळखले आहे.

---

[*] **2:6** *“येशूंठायी आहोत”*- योहान 17:21-23; रोम 6:3-4; 1 करिं 12:13; इफि 1:1,3.

[*] *“जसे येशूंचे होते”*- पाहा 1 पेत्र 2:21; इफि 5:1; 1 थेस्स 1:6;

[*] **2:7** *“ऐकले होते”*- 1:1-3. तो संदेश, ते वचन हे आहे की ख्रिस्त कोण आहेत, ते काय आहेत; त्यांची इच्छा काय आहे की आपण कसे असावे आणि काय करावे. पाहा 3:23.योहान एखादी विचित्र नवीन बाब सांगत नव्हता, असे काहीही सांगत नव्हता, जे त्याने स्वतः रचलेले होते (2 पेत्र 1:16शी तुलना).

[*] **2:8** *“नवी”*- जुन्या आज्ञेप्रमाणेच परंतु पुन्हा ज्यावर भर दिला गेला व जे नव्या स्वरूपात प्रस्तुत करण्यात आले.

[*] *“चकाकतो”*- येशूंच्या आगमनापूर्वी जगात भयंकर व प्रचंड आंतरिक अंधार, सर्व ठिकाणी पसरलेला होता (यश 60:2). येशू प्रकाश स्वरूपात (प्रकाश होऊन) आले (योहान 8:12) त्यांनी आपल्या शिष्यांना चमकणाऱ्या येशूंचे शिष्य सत्यवार्तेद्वारे लोकांना प्रकाश देतात. हा प्रकाश इस्त्राएलात चमकू लागला, पण योहानाच्या दिवसांत हा प्रकाश संपूर्ण रोमन साम्राज्यात चकाकू लागला. आता, हा प्रकाश जगातील सर्व देशांत चमकतो आहे.

[*] **2:9-11** आपण अंधारात आहोत की प्रकाशात, याचे प्रमाण व पुरावा, ‘प्रेम’ हेच आहे. लोक खूप मोठाले विचार करू शकतात, ते बरेच काही करू शकतात. ते स्वतःला फसवू शकतात, इतरांना धोका देऊ शकतात. परंतु ज्यांच्याठायी प्रेम आहे, ते त्यांच्या वागणुकीवरूनच ओळखू शकतात की असे ढोंगी लोक किती उथळ पाण्यात आहेत. प्रेम व प्रकाश यांची सोबत एकत्र असते तसेच द्वेष व अंधार ही एकमेकांबरोबर असतात.

[*] *“भावाचा”*- कदाचित 'दुसरा विश्वासी (ख्रिस्ती).' योहान असे बोलत नाहीये की ख्रिस्ती विश्वासी, अन्यजातीय लोकांचा द्वेष करू शकतो. पाहा मत्त 5:44;आपल्या हृदयात स्वर्गीक प्रेम साठलेले असेल तर आपण सर्वांवर प्रेम करू, ते सुद्धा आपल्या लोकांपेक्षा (विश्वासी) कितीतरी अधिक.

[*] **2:10** *“अडळखण्याचे ...कारण”*- (वचन 10) कदाचित याचा अर्थ - त्याच्या जीवनात अडखळण्याचे कोणतेही कारण नसेल. आपल्या अंतःकरणातील ‘ख्रिस्त-प्रेम’ आपल्याला असे तयार करेल की आपण इतरांकरता अडखळण्याचे कारण होणारच नाही. ख्रिस्ती लोकांत आपसातील प्रेमाची उणीव, इतरांसाठी एक प्रचंड बाधा आहे - पाहा रोम 14:13; 1 करिं 8:9; 10:32; 2 करिं 6:3.

[*] **2:11** *“कोणत्या दिशेने”*- योहान 12:35; नीति 4:19.

[*] *“आंधळे”*- तुलना 2 करिं 4:4.

[*] *“ख्रिस्तांमुळे”*- येशू जे आहे आणि त्यांनी जे काही केले आहे, त्यामुळेच आपले अपराध क्षमा करण्यात आलेले आहे. कारण आपण येशूंसंबंधी, परमेश्वराचा प्रकाश स्वीकार केला आणि परमेश्वराची इच्छा आहे की त्यामुळेच आम्हांला क्षमा मिळावी.

[*] **2:12** *“क्षमा झालेले”*- 1:7-9.

[*] *“बापांनो”*- वचन 1; मत्त 5:16.

[*] *“प्रारंभापासून”*- 1:1. हा इशारा येशूंकडे केलेला आहे.

[*] **2:13** *“ओळखलेले”*- वचन 3; योहान 17:3; 2 करिं 4:6; मत्त 11:27.

[*] *“विजय”*- पाहा 4:4; 5:4; प्रकटी 2:7; 12:11; 21:7.दुष्ट म्हणजे सैतानच होय. जेव्हा लोकांचे हृदय परिवर्तन होते, ते ख्रिस्तांवर भरंवसा ठेवून, खरे व सात्विक जीवन, जगण्याला प्रारंभ करतात, तेव्हा त्या दुष्टावर अर्थात सैतानावर ते विजय मिळवतात.

तरूणांनो, मी तुम्हांला याकरता लिहीत आहे कारण तुम्ही बलशाली* (मजबूत) आहा आणि परमेश्वराचे वचन* तुमच्यात कायम टिकून (वसते) रहाते आणि तुम्ही दुष्टाला (सैतान) जिंकून घेतलेले आहे. 15 *या जगाच्या* आकर्षणांत पडू नका आणि जगातील गोष्टींच्या नादी लागू नका. जर कोणी जगावर प्रेम करतो, तर त्याच्यात पित्याचे प्रेम नाहीये*. 16 जे काहीही* या जगात आहे - शारीरिक* अभिलाषा, डोळयांची अभिलाषा व जीवनाविषयीचा (संसारिक) गर्व, पित्यापासून नाहीये, परंतु तो या जगापासून आहे.
17 हे जग नाहीतसे* होत आहे आणि त्याच्या अभिलाषाही, पण जो कोणी परमेश्वराची इच्छा पूर्ण करतो* तो सर्वकाळ राहील.
18 लहान बाळांनो, शेवटचा समय* येऊन ठेपला आहे आणि जसे तुम्ही ऐकले होते की ख्रिस्त विरोधक* येईल ते सत्य होते, कारण ख्रिस्तविरोधक आताही बहुत* आहेच, त्यावरून आपल्याला कळते की ही शेवटली घटका आहे. 19 ते आपल्यातून* निघून गेलेत,

---

**2:14* *"बलशाली"*- तरूणांठायी मजबूत शरीर व परमेश्वराविषयीचे ज्ञान देखील आहे, त्यामुळेच त्यांना सैतानावर विजय मिळवता येतो.

* *"परमेश्वराचे वचन"*- वचन 24,27; योहान 15:7; स्तो 119:11; कल 3:16.

***2:15** आता योहान सर्वांना विनंती करतो आणि त्याबरोबरच आज्ञा सुद्धा देतो आहे.

* *"जगाच्या"*- 3:1,13; 4:5; 5:19. या पत्रात हा दुसरा मुख्य शब्द आहे आणि सुमारे 20 दा वापरलेला आहे. याचा अर्थ आहे : एक असा क्रम ज्याची रचना परमेश्वराला वगळून, स्वतः मनुष्यानेच केलेली आहे. मनुष्याच्या वाईट स्वभावाने समृद्ध असा समाज, त्याचे विचार, अनेक धर्म, जगण्याची शैली इत्यादि तयार झालेली आहे. बायबलच्या आधारे हे जग परमेश्वराला ओळखत नाही. (योहान 14:17; 15:21). विश्वासी कोण आहे, त्याचे ज्ञान या जगाला नाहीये (1 योहान 3:1). येशू व त्यांचे विश्वासी याचा, जग द्वेष करते (3:13; योहान 15:18,24). हे जग सैतानाच्या ताब्यात व नियंत्रणात आहे (5:19; इफि 2:1-2). प्रभूने विश्वासींना या जगातून वेगळे केलेले आहे, 'त्यांनी प्रभूचे खास लोक व्हावेत म्हणून' (योहान 15:19; 17:6,14,16). याच सर्व कारणांमुळे विश्वासी जगावर प्रेम करत नाहीत.

* *"जर कोणी...नाहीये"*- जे काही 'सत्य परमेश्वराला हवे आहे, जशी त्याची इच्छा आहे, त्या सर्व गोष्टींविरूद्ध हे जग आहे. म्हणून 'जगावर प्रेम करणारे' हे प्रगट करतात, की त्यांच्याठायी परमेश्वराकरताचे प्रेम कमी आहे. मग त्या ख्रिस्ती लोकांविषयी काय म्हणावे, जे जगिक वस्तूंच्या नादी लागून, त्या प्राप्त करण्याकरता त्याच्या मागे धावत असतात आणि जगाची नक्कल (त्याच्याप्रमाणेच) करून, त्या वस्तूंची लालसा बाळगत असतात? असे लोक परमेश्वराला ओळखतही नाहीत आणि त्यांना परमेश्वरी प्रेमाचीही ओळख नाहीये.

***2:16** *"जे काहीही"*- पतित जगात, भ्रष्ट दुनियेत, असे काहीही नाहीये, ज्यावर विश्वासीने प्रेम करावे; त्याच्या प्रेमालायक, या जगात काहीही नाहीच मुळी. जगात अशा इच्छा आहेत ज्या मनुष्याच्या वाईट स्वभावातून बाहेर येतात, जन्म घेतात. जगात आपण अशा इच्छा पाहू शकतो, ज्या अहंकाराद्वारे उत्पन्न होतात, गर्वामुळे येतात - याच सर्व गोष्टी या जगात आढळतात - तुलना उत्प 4:21; मत्त 15:19; रोम 1:28-32. याच कारणास्तव विश्वासीने जगासारखे व्हावयाचे नाहीये.

* *"शारीरिक"*- रोम 7:5चे नोट्स.

***2:17** *"नाहीतसे"*- परमेश्वर जगाचा न्याय करेल, दंड देईल आणि अनंत काळासाठी त्याला वेगळे काढेल (प्रेषि 17:31; यश 24:1-13; 2 पेत्र 3:10-13).

* *"परमेश्वराची...करतो"*- मत्त 7:21.आता बारीक लक्ष द्या की योहान कशा प्रकारे केवळ विश्वासावरच नाही तर कृतीवर देखील भर देतो आहे; आणि त्याला खात्री होतीच की आपण कृपा व विश्वासामुळे उद्धारले जातो, तरीही तो या गोष्टीवर (कृती) अधिक भर देतो आहे. तुलना - याकोब 2:14-26.खरा विश्वास कोणत्याही जीवनात बदल घडवतो आणि त्याच खऱ्या विश्वासामुळे प्रभूच्या आज्ञा पाळण्याचे अंतःकरण घडवले जाते. पाहा प्रेषि 22:10चे नोट्स. प्रभूची ही इच्छा आहे की आपण त्याच्यावर विश्वास ठेवावा, त्याला आपला स्वामी आणि उद्धारकर्ता मानावे. अशा प्रकारचे लोकच, केवळ परमेश्वराबरोबर अनंत काळ राहतील; दुसरे (बाकी) सर्व लोक 'दुसऱ्या मरणाचा' अनुभव घेतील (प्रकटी 20:14-15).

***2:18** *"शेवटचा समय"*- प्रेषि 2:17; रोम 13:11-12; याकोब 5:3; 1 पेत्र 1:20; प्रकटी 1:3शी तुलना. तुलना - 2 पेत्र 3:8.

* *"ख्रिस्त विरोधक"*- वचन 22;4:3; 2 योहान 7; 2 थेस्स 2:3-4.ख्रिस्त विरोधक, येशूंचा विरोध करेल. खात्रीने, तो 'परमेश्वर' असण्याचा दावा करेलच.

* *"बहुत"*- तुलना मत्त 24:4-5; 2 करिं 11:13-15.

***2:19** *"आपल्यातून"*- ते खरे व सात्विक विश्वासी नव्हते. त्यांचे निघून जाणे, सिद्ध करते की ते सर्व ख्रिस्तांचे नव्हते. प्रभूचे निवडलेले, विश्वासात दृढ/ कायम राहतील (इब्री 10:39; योहान 6:67-68).

पण त्यांच्यापैकी कोणीही आपल्यातील नव्हताच मुळी. 20 तुमच्याठायी पवित्रात्मातर्फे* झालेला अभिषेक* देखील आहे आणि
तुम्हांला सर्व काही ठाऊक आहे*. 21 *मी तुम्हांला यास्तव लिहिले नाही की तुम्हांला सत्य माहित नाही, पण याकरता की तुम्हांला ते
कळते आणि कोणतेही असत्य (लबाडी) सत्यापासून निघत नाही. 22 *खोटारडा आहे कोण? तोच, जो ही गोष्ट नाकारतो (अमान्य)
की येशू मुक्त करणारे (उद्धारक) आहेत. जो पित्याला आणि पुत्राला स्वीकारीत नाही तोच ख्रिस्तविरोधक आहे. 23 *जो पुत्राचा
नकार करतो, त्याच्याजवळ पिता नाही, परंतु जो पुत्राला मानतो (स्वीकार) त्याच्याजवळ पिताही आहे. 24 म्हणून, जे तुम्ही
प्रारंभापासून ऐकलेले* आहे, ते आपल्या अंतःकरणात टिकून राहू द्या. जे तुम्ही प्रारंभापासून ऐकलेले आहे, जर* ते तुमच्याठायी
कायम स्थिर* राहिले, तर तुम्ही सुद्धा पुत्र व पित्याठायी स्थिर रहाल. 25 आणि जी प्रतिज्ञा त्यांनी केलेली आहे, ती सार्वकालिक
जीवन* आहे. 26 जे लोक तुम्हांला बहकवून* मार्ग चुकण्यास भाग पाडतात, त्यांच्याविषयी मी या गोष्टी तुम्हांला लिहिल्या आहेत.
27 परंतु तुम्ही जो अभिषेक त्यांच्यापासून मिळवलेला आहे, तो तुमच्यात तसाच राहिलेला आहे*. एखाद्या (कोणत्याही) मनुष्याने
तुम्हांला शिकवण्याची गरज नाहीये. तुमच्या अंतःकरणातील अभिषेक सर्व गोष्टींविषयी तुम्हांला ज्या प्रकारे शिकवतो*, ते सत्य

---

* *"पवित्रात्मातर्फे"*- मार्क 1:24; प्रेषि 2:27; 3:14.

***2:20*** *"अभिषेक"*- तुलना 2 करिं 1:21-22.हा अभिषेक परमेश्वरी आत्म्याचे बक्षिस आहे - 3:24. परमेश्वराचे सेवक होण्याचे हेच एक प्रमाण आहे. "ख्रिस्त" म्हणजे अभिषिक्त - मत्त 1:1.विश्वासींठायी हा अभिषेक आहे, म्हणूनच ते ख्रिस्तविरोधकांना ओळखू शकतात. विश्वासी त्याच्या शिक्षणावरून आणि व्यवहारावरून ओळखून घेतील की, ते येशूंची सेवा करणारे नाहीत.

* *"तुम्हाला सर्व काही ठाऊक आहे"*- योहान या हेतूने बोलत नाहीये की जे काही कळू शकत होते त्याविषयी त्या विश्वासींना सर्व काही ठाऊक होते, कारण त्याला माहीत होते की परमेश्वरालाच सर्व काही कळू शकते. तो, ज्या विश्वासींना लिहित होता, त्याच्याठायी पवित्र आत्मा होता आणि त्यांना सत्याविषयीचे शिक्षण देण्यात आले होते. त्यांना ठाऊक होते की तो जे काही लिहित होता, ते सर्व पुरेपूर सत्यच होते. ज्यांच्याजवळ, बायबल आहे आणि परमेश्वरी आत्मा आहे, त्या आपणा सर्वांना सर्व उचित व योग्य ते आंतरिक ज्ञान मिळू शकते.

***2:21** वचन 13 - जे काही बायबलद्वारे शिकवले जाते, ते सोडून त्यापासून दूर किंवा वेगळे जाणे/होणे, धोक्याचे आहे.

***2:22** जो कोणी म्हणतो की येशू अभिषिक्त नाहीत, परमेश्वर नाहीत, तो लबाड आहे, थापाडया आहे आणि कदाचित सर्वात मोठा खोटारडा, काही लोक असेच करतात. ते या गोष्टीचा विरोध करतात की येशूंठायी परमेश्वर व मनुष्य हे दोन्ही स्वभाव आहे; येशू परमेश्वर आहे ते मनुष्य रूपात आलेत, ही गोष्ट देखील ते नाकारतात. तुलना - योहान 5:23पाहा - येशूंचे परमेश्वर असण्याविषयी - फिलि 2:6; लूक 2:11.

***2:23** लोक काहीका म्हणेनात, ही गोष्ट पक्की आहे की, जे येशूंना परमेश्वर म्हणून स्वीकारत नाहीत, त्यांच्याजवळ परमेश्वर नाहीच मुळी. 'येशूंना महत्व न देता परमेश्वराचा स्वीकार करू' असा विचार करणे चुकीचे/अयोग्य आहे. जे येशूंवर विश्वास ठेवतात, त्यांच्याजवळ परमेश्वर-पिताही आहेच.

***2:24** *"ऐकलेले"*- 1:1; 2:7.

* *"जर"*- इब्री 3:6,14; कल 1:23; 1 करिं 15:2.

* *"कायम स्थिर"*- योहान 15:4-5,7,9,10.

***2:25** *"सार्वकालिक जीवन"*- 5:11; तीताला 1:2; योहान 3:16; 6:47.

***2:26** *"बहकवून"*- 3:7; मत्त 24:4,14; 2 करिं 11:3; प्रकटी 12:9.अशा प्रकारच्या बहकवणाऱ्या, मार्ग चुकण्यास भाग पाडणाऱ्या जगात आपण राहतो, वावरतो - जर आपण येशूंवर विश्वास ठेवला तर, सैतान व त्याचे दूत (सोबतीचे), आपल्याला खऱ्या विश्वासापासून बहकवण्याचा भरसक व प्रत्येक प्रकारचा प्रयत्न करतील की आपण आपल्या खऱ्या विश्वासापासून दूर कुठेतरी भटकून जावे.

***2:27** *"राहिलेला आहे"*- पवित्र आत्मा विश्वासींना सोडून (त्यागून) देत नाही. (योहान 14:16; इफि 1:13-14).

* *"शिकवतो"*- त्या विश्वासींना ख्रिस्त विरोधक व खोट्या शिक्षकांविषयीचे शिक्षण देण्यात आलेले होते - येथे हाच संदर्भ आहे. परमेश्वराचा आत्मा त्यांच्या आत होता, पवित्र आत्म्याच्या वास्तव्यामुळे, त्यांना खरेखोटे कळू शकत होते. प्रेषिताने त्यांना नवीन गोष्टींचे शिक्षण देण्याची गरजच नव्हती. त्यांना खोट्या शिक्षकांचीही आवश्यकता नव्हती, 'त्यांच्याजवळ, नवे सत्य आहे' असा दावा करत होते तरीही. योहान चर्चमधे, शिक्षक (शिकवणारे) नकोत किंवा त्यांची गरज नाही असे म्हणत नव्हता व शिक्षक हवेत, ही गोष्ट नाकारत नव्हता. परमेश्वर स्वतःच शिक्षकांना नियुक्त करतो की, त्यांनी चर्चला वचनांचे शिक्षण द्यावे (इफि 4:11; 1 करिं 12:28) आणि योहान देखील स्वतः त्यांच्यापैकीच एक होता. योहान ज्या लोकांना लिहितो आहे, त्यांना शिकवण्यात आलेले होते

आहे आणि ते खोटे नाहीये. जे काही या अभिषेकापासून तुम्ही शिकला आहा*, तसेच करत रहा. [28] आता छोटया बाळांनो, येशूंमध्ये रहा* कारण त्यामुळे असे होईल, की जेव्हा ते प्रगट* होतील तेव्हा आपल्याला भरवसा राहील, जेणेकरून त्यांच्या आगमनाच्या समयी आपल्याला लाज वाटू नये* . [29] जर तुम्हांला ठाऊक आहे की ते निर्दोष व खरे* आहेत, तर हे देखील सत्य आहे की प्रत्येक जण जो योग्य (नीतिमत्वाचे) जीवन जगतो, तो त्यांच्यापासून जन्मलेला* आहे.

## 3

[1] आपण परमेश्वराचे संतान (मुलें-मुली)* म्हणवले जावे म्हणून, पित्याने* आपल्यावर कसे प्रेम* ओतले आहे ते पाहा. जग* परमेश्वराला ओळखत नाही म्हणून ते आपल्यालाही ओळखत नाही. [2] प्रियांनो, आता आपण परमेश्वराची मुलेंमुली आहोत, या समयी हे ठाऊक नाहीये की आपण भविष्यकाळी काय असू*, पण आपल्याला एवढे ठाऊक आहे, की जेव्हा येशू येतील* आपण त्यांच्यासारखेच होऊ*, कारण आपण येशूंना तसेच पाहू* जसे ते आहेत. [3] *प्रत्येक जण, ज्याच्याठायी अशीच आशा आहे, तो

---

आणि ते सत्य ओळखत होते. आपण कितीही ज्ञानी असलोत तरीही आपल्यापैकी प्रत्येकाने, खऱ्या शिक्षकांपासून शिक्षण घेण्याविषयी मागेपुढे पाहू नये, संकोच बाळगू नये. आपण ज्ञान प्राप्त करण्याचा कितीही दावा केला तरीपण, 'खऱ्या' शिक्षकांपासून शिकण्याची आपली नेहमी तयारी व तत्परता असावी.

* *"अभिषेकापासून...आहा"*- परमेश्वराच्या आत्म्याच्या साहाय्याने आपण आंतरिक सत्य शिकतो आणि त्यांना आणखी दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने शिकवले जाऊ शकत नाही. 1 करिं 2:10-14; यश 59:13; स्तो 25:4-5शी जुळवा. शिक्षक (येशू) आपल्याठायी (आत) आहे - रोम 8:9,15,16.

***2:28** *"रहा"*- वचन 24.

* *"प्रगट"*- 3:2; मत्त 24:30; कल 3:4; 1 तीम 6:14; तीताला 2:13; इब्री 9:28.

* *"लाज वाटू नये"*- ज्या वेळी आपण त्यांना प्रसन्न करण्याचा भरसक प्रयत्न करून, अगदी तसेच जीवन जगतो जसे येशूंना हवे आहे त्या वेळीच आपल्याला लाज वाटत नाही. हे केवळ त्याच्याठायी दृढ होऊन राहण्याद्वारेच शक्य आहे - योहान 15:4-5.

***2:29** *"निर्दोष व खरे"*- मनुष्याच्या कार्यावरून कळते की तो कसा आहे (मत्त 7:15-20). योग्य तेच करण्याविषयीचे नोट्स - मत्त 7:21; रोम 6:16-18; 8:4.

* *"जन्मलेला"*- योहान 3:3-8; याकोब 1:18; 1 पेत्र 1:23.

***3:1** *"परमेश्वराची मुलें-मुली आहोत"*- योहान 1:12-13; रोम 8:16-17; फिलि 2:15; इब्री 2:13; 1 पेत्र 1:14.प्रत्येक जण परमेश्वराचे संतान नाहीये - केवळ तोच ज्याने/जिने, येशू ख्रिस्तांचा स्वीकार केलेला आहे.

* *"पित्याने"*- मत्त 5:16चे नोट्स.

* *"कसे प्रेम"*- 4:8-10; योहान 3:16; रोम 5:8; इफि 1:4; 2:4.आपण केवळ नरकात जाण्यायोग्यच आहोत. केवळ परमेश्वराच्या नितळ प्रेमामुळेच त्याने आपल्यासारख्या अपराध्यांना आपले संतान व्हावयाचा आशीर्वाद दिलेला आहे.

* *"जग"*- आपल्याला ओळखत नाही - योहान 15:21; 16:3.कारण विश्वासी नवीनीकरण झालेले लोक आहेत, ते ख्रिस्तांठायी आहेत, ज्या प्रकारे जग ख्रिस्तांना ओळखत नाही, त्याच प्रकारे ते आपल्यालाही ओळखत नाही. ज्या प्रकारे ख्रिस्त या जगात येऊनही, जगाचे नव्हते त्याच प्रकारे विश्वासी देखील आहे (योहान 17:14,16). विश्वासींचा नवा स्वभाव, हेतू, लक्ष्य, विश्वास किंवा कोणतीही गोष्ट जी रचनाकार परमेश्वराने त्याच्या अंतःकरणात ठेवली आहे, ते सर्व काही हे जग ओळखत नाही.

***3:2** *"काय असू"*- अनंत काळापर्यंत आपण, परमेश्वराचे संतान या रूपात काय असू, हे आतापर्यंत आपल्याला ठाऊक नाहीये.

* *"जेव्हा येशू येतील"*- 2:28.

* *"आपण...होऊ"*- पाहा रोम 8:29.कोणत्याही मनुष्याकरता अपेक्षित असलेले सर्वात महान 'लक्ष्य-हेतू-उद्दिष्ट' हेच असू शकते. ज्या समयी विश्वासी येशूंना पाहातील, ते अनंतकाळाकरता येशूंच्या समानतेत बदलतील (होतील) (1 करिं 15:48-54).

* *"येशूंना तसेच पाहू"*- मत्त 5:8; 1 करिं 13:12; प्रकटी 22:4.

***3:3** जे लोक येशूंच्या आगमनावर त्यांच्यासारखेच होतील, ते विश्वासी, या धरतीवर आताही, येशूंसारखेच होऊ इच्छितील. येशूंसारखे होण्याच्या प्रक्रियेचा या पृथ्वीवर प्रारंभ झालेला आहेच (2 करिं 3:18; कल 3:9-10). खरा विश्वासी, शुद्धीकरणाच्या या प्रक्रियेत परमेश्वराला खात्रीने सहयोग देईलच - तुलना इब्री 12:14.

स्वतःला तसाच पवित्र करतो[*], जसे येशू पवित्र आहेत. 4 [*]जो कोणी न्याय्य (योग्य) व्यवहार करण्यात उणे पडतो, तो नियमशास्त्र (परमेश्वराचे मापदंड) मोडतो, कारण तसे करणे (अपराध करणे) नियमशास्त्राविरूद्ध जाणे होय. 5 तुम्हांला ठाऊक आहे, की येशू गुन्हें हरण[*] करावयासच (अर्थात ती स्वतःवर लादावयासच) आले आणि त्यांच्याठायी कोणताही अपराध किंवा गुन्हा नाहीये[*]. 6 [*]जो कोणी येशूंठायी स्थिर असतो, तो गुन्हा करणे कायम ठेवत नाही[*]. जो गुन्हा करणे चालूच (कायम) ठेवतो त्याने येशूंना पाहिलेही नाहीये आणि ओळखलेही नाहीये. 7 लहान मुलांनो, कोणीही तुम्हांला ठकवू (धोक्यात ठेवू) नये[*]. जो योग्य व बरोबर तेच करतो, तोच नीतिमान[*] (सिद्ध) ठरवला गेलेला आहे, जसे स्वतः येशू ख्रिस्त आहेत. 8 जो गुन्हा करत राहतो तो सैतानाचा[*] (पासून) आहे. कारण सैतान प्रारंभापासून[*] अपराध करीत आलेला आहे. परमेश्वराचा पुत्र याचकरता प्रगटला, की त्याने सैतानाची कृत्यें नष्ट करावीत[*]. 9 जो कोणी परमेश्वरापासून जन्मलेला[*] आहे, तो अपराध करणे कायम ठेवत नाही[*], कारण त्याचे बीज[*] त्यात वसलेले

---

[*] *“पवित्र करतो”*- 1:7,9; 2 करिं 7:1. या प्रकाशात (पारदर्शक) जीवन जगण्याद्वारेच विश्वासी आपले जीवन शुद्ध करू शकतो.

[*]**3:4** अपराध करणे म्हणजे परमेश्वराच्या इच्छेविरूद्ध जाणे आणि खऱ्या योग्य शिक्षणाविरूद्ध जाणे होय. असे करणे म्हणजे जणू काही असे वागणे की परमेश्वरी इच्छा अस्तित्वात नाहीच जणू किंवा ‘योग्य-न्याय्य’ वागणुकीची कोणतीही रूपरेषा नाहीच मुळी. प्रियांनो परमेश्वरी इच्छा व परमेश्वरी मापदंडाचे उल्लंघन करणे, हे केवळ मनुष्याच्या स्वार्थी इच्छांकरताचे जगणे होय.

[*]**3:5** *“गुन्हें हरण”*- योहान 1:29; रोम 11:27; इब्री 9:28; 10:11,15,17.

[*] *“कोणताही...नाहीये”*- इब्री 4:15; 7:26.असे केवळ आणि केवळ येशू ख्रिस्तांसाठीच शंभर टक्के खात्रीने केलेले विधान होय, जे केवळ त्यांच्याकरताच केले जाऊ शकते. योहानाने आधीच सांगितलेले आहे की या प्रकारचा दावा शिष्य करू शकत नाहीत - 1:8.

[*]**3:6** प्रत्येक जण, एकतर ख्रिस्तांठायी आहे किंवा दुष्टाईठायी. जे ख्रिस्तांत नाहीत ते दुष्टाईत जगतात. जे ख्रिस्तांत आहेत ते असे करू शकत नाहीत, ते नव्या पद्धतीने जन्मलेले आहेत (2:29). ते सत्य परमेश्वराची मुलें व कन्या आहेत; म्हणून परमेश्वराचा स्वभाव सुद्धा त्यांच्या आत आहे (3:1). परमेश्वराचा आत्मा त्यांच्यात वसतो 4:13. जीवन जगतांना आता, सिद्ध जीवन ते, या समयी जगू शकत नाहीत इफि 2:1-3. अर्थात शिष्य अपराधात पडण्याची संभावना असते 1:7; 2:1; 5:16;परंतु अपराधमय जीवनात ते जगू शकत नाहीत (नीति 25:16). जर त्यांनी तसे केलेच तर, त्यांचा नवा स्वभाव, वाईटाविरूद्ध बंड (विद्रोह) करतो आणि तसे करण्याचे सोडून देण्यासाठी त्यांना भाग पाडतो (बाध्य करतो). त्या नव्या स्वभावाच्या विद्रोहामुळे विश्वासीचा जुना स्वभाव अस्वस्थ होतो. ख्रिस्त अशी प्रार्थना करतात की, विश्वासीच्या जीवनातून दुष्टाई निघून जावी (लूक 22:31-32; योहान 17:17; इब्री 7:25), आणि पवित्र आत्मा विश्वासीला निर्देश देतो की त्याने वाईट मार्ग त्यागावा. जर लोक (विश्वासी) दावा करतात की ते ख्रिस्ती आहेत, पण तरीही वाईट जीवन जगण्याचे सोडत नाहीत, दुष्टाईत लिप्त असतात, ते असेच दर्शवतात की त्यांचा नवा जन्मही झालेला नाही आणि ते ख्रिस्तांचे मेंढरूही नाहीत. परमेश्वराची मुलें व कन्या, सैतानाच्या संतानांहून अगदी वेगळे आहेत, त्यांच्यात फार मोठा फरक आहे; आणि ते त्यांच्या व्यवहारातून, वागणुकीतून आणि आचार-विचारांतून दिसते.

[*] *“गुन्हा करणे...ठेवत नाही”*- हा ग्रीक शब्द वर्तमान काळात वापरलेला आहे. याचा सोपा अर्थ म्हणजे विश्वासी अपराधांची जीवन शैली स्वीकारत नाही, उपयोगात आणत नाही. परंतु, याचा अर्थ, अपराधरहित होणे असा नव्हे 1:9; 2:1.

[*]**3:7** *“ठकवू नये”*- 2:26; 1 करिं 3:7-8; गल 6:7; इफि 5:6.लोकांसाठी दोन प्रकारचे जीवन (शैली) आहे - अपराधाचे जीवन व योग्य जीवन. प्रत्येक जण या दोनपैकी, कोणत्या तरी एका परिसीमेत (क्षेत्रात) आहे - तुलना - मत्त 7:13-14; रोम 2:6-10.याचा अर्थ असा नाहीये की निर्दोषी (अपराधांची क्षमा मिळवलेला) मनुष्य अपराध करत नाही (1:7,9; 2:1; याकोब 3:2) किंवा अपराध क्षमा न मिळवलेला मनुष्य काहीही चांगले करत नाही. योहान येथे - एखाद्या मनुष्याच्या जीवनाच्या पूर्ण जीवनचक्राविषयी (जीवनशैली) सांगतोय. ज्याने क्षमा मिळवलेली आहे, त्या प्रत्येकाच्या जीवनात , त्याने पुढे मांडलेले ध्येय योग्य व न्याय्य तेच करणे हे नेहमी असते. एका अपराधी मनुष्याच्या जीवनात 'वाईट करण्याची प्रवृत्तीच' साम्राज्य करत असते.

[*] *“नीतिमान”*- सिद्ध 2:29.

[*]**3:8** *“सैतान”*- मत्त 4:1; इफि 2:2.प्रत्येक मनुष्य एकतर सैतानाचा आहे किंवा परमेश्वराचा (वचन 10) पाहा योहान 8:44.जर परमेश्वर आपल्या जिवनावर नियंत्रण ठेवत नसेल, तर खात्रीने आपण सैतानाच्या नियंत्रणात आहोच.

*“प्रारंभापासून”*- सैतान, प्रारंभी असलेला दुष्ट होता.

[*] *“प्रारंभापासून”*- सैतान, प्रारंभी असलेला दुष्ट होता.

[*] *“सैतानाची...करावीत”*- सैतानाचे कार्य अपराध व मरण आहे. येशू ख्रिस्त आपल्या निवडलेल्यांतून ही दोन्ही नष्ट करावयास आले. आपल्या लाडक्या लोकांच्या वाईट कार्यांकरता (अपराधे) मरणे व पुन्हा जिवंत (पुनरूत्थान) होण्याकरता येशू ख्रिस्तांनी, अपराध व मरण यांचा विनाश व सैतानाच्या विनाशाचा पाया रचला.

(दृढ/स्थिरावलेले) असते.*; तो अपराधांत स्थिरावलेला राहू शकत नाही, कारण तो परमेश्वरापासून जन्मलेला आहे. [10] *यावरून, परमेश्वराचे संतान व सैतानाचे संतान यांतील फरक पाहिला जाऊ शकतो. जो योग्य (न्याय्य) वागणूक.* स्थिर ठेवत नाही, तो परमेश्वरापासून नाहीये, तो सुद्धा जो आपल्या भाऊबहिण.*ीं वर प्रेम.* करत नाही. [11] *जी येशू-वार्ता, तुम्ही प्रारंभापासून ऐकली, ती हीच आहे की आपण एकमेकांवर प्रेम करावे. [12] त्या दुष्टापासून जो होता व ज्याने आपल्या भावाची हत्या केली, त्या काईनासारखे.* आपण होता कामा नये. त्याने आपल्या भावाचा खून का केला? कारण त्याची कृत्यें दुष्टाईची होती आणि त्याच्या भावाची कृत्यें नीतीची (उत्तम) होती. [13] *माझ्या भाऊबहिणींनो, जग जर तुमचा द्वेष करत असेल, तर आश्चर्य करू नका. [14] आपल्याला ठाऊक आहे, की आपण मरण पार करून जीवनात दाखल झालेले आहोतच.*, कारण आपण भावांवर प्रेम करतो आणि जो आपल्या भावांवर प्रेम करत नाही, तो मरणाच्या.* दशेत राहतो. [15] *जो आपल्या भावाचा तिरस्कार (द्वेष) करतो, तो हत्या करणारा.* आहे आणि तुम्हांला ठाऊक आहे की कोणत्याही खूनीठायी अनंत जीवन (परमेश्वरी जीवन) असू शकत नाही. [16] यावरूनच आपण परमेश्वराचे प्रेम ओळखतो.* , कारण त्याने आपल्यासाठी स्वतःची कुर्बानी (प्राण) दिली . आपल्या भाऊबहिणींकरता, आपण सुद्धा

---

***3:9** *“जन्मलेला”*- योहान 3:3-7.

* *“अपराध...नाही”*- वचन 6.

* *"त्याचे बीज"*- परमेश्वरी बीज, आंतरिक बीजापासून, आंतरिक जीवन देते (1 करिं 9:11). हे बीज म्हणजे बायबल, (याकोब 1:18; 1 पेत्र 1:23; मत्त 13:3,23; लूक 8:15). हे बीज, लोकांच्या अंतःकरणांत (हृदयांत) पेरले जाते. ते रूजते, प्रस्फुटीत होते व नव्या स्वभावास जन्म देते.

* *“वसलेले (दृढ) असते”*- विश्वासींना या गोष्टीचे भय मुळीच नसावे की त्याच्या मनात पेरलेले बीज मरण पावेल किंवा सैतानाद्वारे चोरले जाईल. प्रियांनो, परमेश्वरी बीज स्थिरावून - दृढ राहील आणि प्रभु, आपले ते कार्य जे त्याने प्रारंभिले आहे, कायम करत राहील (फिलि 1:6; 2:23).

***3:10** योहान स्पष्ट कथन करतो की प्रत्येक मनुष्य एकतर परमेश्वराचे लेकरू आहे किंवा मग सैतानाचे (योहान 8:44; मत्त 13:38). एक मनुष्य काय करतो किंवा काय करत नाही, त्यावरून आपण सांगू शकतो आणि ठरवू शकतो की तो कोण-काय आहे (मत्त 7:15-20).

* *“योग्य (न्याय्य) वागणूक”*- ‘योग्य’ तेच आहे जे करावयाचे ‘बायबल’ शिक्षण देते, ते सर्व नाही जे लोक करावयास शिकवतात. (तुलना - योहान 16:2) पाहा, जे लोक योग्य व न्याय्य कृत्यें करत नाहीत, त्याविषयी त्यांना आभास व जाणीव असो किंवा नसो, ते चुकीचेच वर्तन करत आहेत आणि जर ते योग्य करावयाचा अभ्यास व सराव करणार नाहीत तर स्पष्ट आहे की ते सैतानाचे आहेत परमेश्वराचे नाहीत.

* *“भाऊबहिण”*- येशूंवर विश्वास ठेवणारे किंवा रक्ताचे नातेवाईक असू शकतात (जसे वचन 12 मध्ये आहे).

* *“भाऊबहिणींवर प्रेम”*- याची आज्ञा येशूंनी दिली होती.

***3:11** योहान 13:34; 15:12,17.

***3:12** *“काईनासारखे”*- उत्प 4:1-8; इब्री 11:4; यहूदा 11. काईन सैतानापासूनचा होता (वचन 10) हाबेल परमेश्वराचा मुलगा होता कारण त्याने तेच केले जे परमेश्वराने सांगितले (इब्री 11:4).

***3:13** योहान 15:18-21.काईन अशा लोकांचा नमूना आहे जे परमेश्वराच्या लोकांचा द्वेष व घृणा करतात.

***3:14** *“मरण पार...झालेले आहोतच”*- पाहा योहान 5:24.ज्यांनी याचा अनुभव घेतला आहे, त्यांच्याठायी त्याचे काय प्रमाण असेल? दुसऱ्या ख्रिस्तींवर प्रेम - तुलना - वचन 19;2:3.

* *“मरणाच्या”*- आंतरिक मरण. (इफि 2:1). असे मन ज्यात प्रेम वसत नाही, ती प्रेमाची उणीवच याचे खास प्रमाण आहे. परमेश्वर जो स्वतः प्रेम आहे, तोच विश्वासींच्या मनांत वसतो आणि प्रेम करावयास मदत करतो.

***3:15** द्वेष व घृणा (तिरस्कार) करणे हे एखाद्याचा जीव घेण्यासारखेच (खून-हत्या) आहे, कारण जर संधी लाभली तर द्वेष करणारा हत्या देखील करेल. प्रभु आपली आंतरिक दशा व आपली कृत्यें ही दोन्ही पाहतो. तुलना मत्त 5:27-30.

* *“हत्या करणारा”*- एक हत्या करणारा, क्षमा मिळवू शकत नाही; जोवर तो अपराध मान्य करत नाही तोवर त्याला क्षमा मिळणे अशक्य आहे. जर तो अपराधें स्वीकारतो (मन परिवर्तन - पश्चात्ताप) व येशूंवर भरंवसा ठेवतो तर तो क्षमादानास पात्र ठरतो. मग तो द्वेष करणे थांबवेल आणि त्याने केलेल्या हत्येविषयी त्याला क्षमा मिळेल.

***3:16** *“यावरूनच...ओळखतो”*- येशूंकडे इशारा करून योहान हेच दर्शवतो की येशू प्रेम आहेत. तो हे सुद्धा शिकवतो की प्रेम करणे म्हणजे काय आहे! पाहा रोम 5:8; गल 2:20; योहान 3:16; 10:11,15.विश्वासींनी दुसऱ्या विश्वासीकरताही प्राण द्यावयास

आपले जीवन अर्पण करावयास हवे. [17] *परंतु ज्या कोणाजवळ जगिक वस्तु आहे, आणि तो आपल्या भावाची गरज पाहूनही आपले अंतःकरण कठोर करतो, त्याच्याठायी परमेश्वराचे प्रेम (किंवा अगापे) कसे वसू शकते? [18] माझ्या लहान मुलांनो, आपले प्रेम शाब्दिक-रीतिने (शब्दरूप) नाही, पण कृत्यांनी व सत्याठायी दिसावे. [19] *यावरून आपल्याला कळते, की आपण सत्याचे आहोत आणि म्हणून येशूंसमोर आपल्या मनाला आपण आश्वासन देऊ शकतो. [20] कारण जर आपले मन (विवेक) आपल्याला दोषी* ठरवते, तर परमेश्वर आपल्या मनांपेक्षा श्रेष्ठ आहे आणि त्याला सर्व काही ठाऊक आहे*. [21] प्रियांनो, जर आपले मन आपल्याला दोषी ठरवीत नसेल तर* आपल्याला परमेश्वरावर भरंवसा* असतो. [22] *आणि आपण जे काही मागतो, ते त्याच्याद्वारे आपल्याला मिळते, कारण आपण त्याच्या आज्ञांचे पालन करतो आणि तेच करतो जे त्याला पसंत (प्रिय) आहे*. [23] ही त्याची आज्ञा आहे की आपण परमेश्वराचा पुत्र येशू ख्रिस्त यांच्या नांवावर विश्वास करावा आणि जशी त्यांची आज्ञा आहे, तसे एकमेकांवर प्रेम करावे. [24] *जो त्यांच्या आज्ञा मानतो तो त्यांच्याठायी दृढ असतो, आणि तो त्यांच्याठायी राहतो. यावरून पवित्र आत्म्याद्वारे आपल्याला कळते* की आपल्या आत्म्याद्वारे* जो त्याने आपल्याला दिलेला आहे तो आपल्याठायी राहतो.

# 4

---

तयार असावे. प्राण देऊन स्वतःची कुर्बानी करण्याद्वारे परमेश्वर तेच स्तर दाखवतो व शिकवतो. दुःखाची गोष्ट आहे की पुष्कळ उत्तम ख्रिस्ती म्हणवणारे लोक, दुसऱ्यांची मदत करण्यात मागे हटतात.

*__3:17-18__ याकोब 2:14,17शी जुळवा. कृती नसलेला विश्वास बेकार आहे. प्रेम शाब्दीक नसून कृतीशील असावे. जे प्रेम उत्तम कार्याद्वारें प्रगट होत नाही, ते प्रेम नाहीये. तसले प्रेम धोका देणारे व व्यर्थ आहे. जेव्हा येशू लोकांचा न्याय करावयास येतील, तेव्हा हेच पाहिले जाईल की लोकांनी काय केले किंवा काय केले नाही. सहानुभूतिच्या भावनांवर आणि गोड शब्दांच्या आधारे, न्याय केला जाणार नाही - मत्त 25:31-46,(वचन 41-46 या शब्दांचा खास अर्थ आहे, 'योहानाच्या शब्दांच्या प्रकाशात'. या गोष्टीत शंकाच नाही की जे लोक खरोखरचे प्रेम, इतरांकरता दर्शवतात, त्यात त्यांचा स्वतःचा कोणताही स्वार्थ नसतो. ते केवळ या करताच, कारण ते स्वतः गरजू असतात आणि त्यांनाही साहाय्याची गरज असते. 2 करिं 9:15चे नोट्स - वचनें).

*__3:19__ वचन 14. जर आपल्याला ठाऊक आहे की आपण आपल्या सोबतच्या विश्वासीवर या कारणाने प्रेम करतो, की आपण आपले प्रेम, मदत करण्याद्वारे दाखवले आहे, तर ते सत्य आपल्याला हेच ज्ञान देते की आपण परमेश्वराच्या सत्याशी योग्य व अगदी योग्यरीतिने जुळलेले आहोत आणि परमेश्वराच्या उपस्थितीत आपल्याला विश्रांती व आश्वासन प्राप्त आहे. कदाचित जे लोक उद्धाराची निश्चयता ओळखत नाहीत, त्याचे एक कारण हेच आहे. त्यांनी आपल्या कार्याद्वारे आपले प्रेम दर्शवलेले नाहीये.

*__3:20__ *"दोषी"*- कधी कधी विश्वासींचे मन त्यांना दोषी ठरवते. अयोग्य कृती केल्यामुळे असे होऊ शकते (1:9; 2:1); किंवा त्यांना आठवण येते की त्यांचे प्रेम किती थोडके आहे, आत्म्याचे फळ किती कमी आहे. त्यांनी जे करावयास हवे होते (अपेक्षित) त्यात ते अपयशी ठरले आहेत. परंतु जर आपण प्रेम करतो आणि कार्याद्वारे ते प्रगट केले आहे, तर आपल्या हृदयाला शांति लाभू शकते.

* *"सर्व काही ठाऊक आहे"*- ते महान आहे आणि दुर्बलता, अपयश, अपराधांविषयी ठाऊक असल्यावरही, परमेश्वर आपल्या संतानाच्या रूपात आपला स्वीकार करतो. तुलना स्तो 103:8-14.

*__3:21__ *"जर...तर"*- जेव्हा आपण प्रेम आणि उचित कार्यांनी आशीर्वादित असतो आणि अपराधांवर विजय मिळवलेला असतो तेव्हा आपले मन आपल्याला दोषी ठरवणार नाही.

* *"भरंवसा"*- हा भरंवसा स्वनीतिमत्वाचा नाहीये परंतु हाच की परमेश्वर आपल्याठायी आहे आणि कार्य करत आहे.

*__3:22__ योहान 14:13-15.

* *"जे...पसंत आहे"*- जर आपण परमेश्वराची आज्ञा पाळत नाही आणि त्याला प्रसन्न करण्याचा आपला विचार व इच्छा नाही, तर परमेश्वराने आपले ऐकावेच असा आग्रह व भरंवसा देखील आपण करू नये. आपले निरंतर आज्ञा उल्लंघन व आज्ञा मोडण्याचे कार्य आणि स्वार्थी जीवन कधीही परमेश्वराचा आशीर्वाद व प्रार्थनांचे उत्तर मिळवू शकत नाहीत. ज्या गोष्टी प्रभूला खुश करतात, त्या प्रेम व विश्वसनीयता या आहेत, होय विश्वासाची तीच कृत्यें जी निव्वळ प्रेमापासून जन्म घेतात. गल 5:6; इब्री 11:6.

*__3:24__ योहान 14:20-23; 17:21-23.

* *"कळते"*- वचन 14,19; 2:5; 4:13.

* *"आपल्या आत्म्याद्वारे"*- पवित्र आत्मा (योहान 14:16-17) विश्वासींना ज्ञान देतो, की ते परमेश्वराची मुलें व कन्या आहेत - रोम 8:15-16. "आपल्याला दिलेला"- 1 करिं 6:19; गल 4:6; इफि 1:13-14.

[1] *प्रिय बंधूभगिनींनो, कोणत्याही आत्म्यावर विश्वास* करून घेऊ नका, पण पारख करा की तो परमेश्वरापासून आहे की नाही, कारण या जगात अनेक खोटे (नकली) संदेष्टे* आहेत. [2] *परमेश्वराच्या आत्म्याची ओळख अशी आहे : प्रत्येक आत्मा, जो कबूल करतो की येशू ख्रिस्त देहाठायी आले, तो परमेश्वरापासून आहे. [3] प्रत्येक आत्मा जो स्वीकार करत नाही*, की येशू देहधारण* करून आले तो परमेश्वरापासून नाहीये. हा ख्रिस्त विरोधक आत्मा आहे, ज्याच्या येण्याविषयी तुम्ही ऐकलेले होते आणि जो आधीच जगात आलेला आहे*. [4] *लहान बाळकांनो, तुम्ही परमेश्वराचे आहा, आणि तुम्ही त्याच्यावर जय मिळवला आहे, यासाठीच की जो या जगात आहे*, त्याच्याहून सर्वश्रेष्ठ तो आहे, जो तुमच्यांत आहे*. [5] ते* जगाचे* आहेत म्हणून जगाविषयी बोलतात आणि जग त्यांचे ऐकते. [6] *आपण* परमेश्वराचे आहोत. जो कोणी परमेश्वराला ओळखतो तो त्याचे ऐकतो , पण जो परमेश्वराचा नाहीये तो आपले ऐकत नाही, यावरून आपल्याला खरे व खोटे ओळखता येते. [7] *प्रियांनो, आपण एकमेकांवर प्रेम करावे*, यासाठी की प्रेम

---

***4:1-6** या वचनांत योहान असे दोन आधार पारखण्यासाठी देतो ज्यांच्या साहाय्याने आपण ओळखू शकतो, पारखू शकतो की लोक सत्याचा स्वीकार करत आहेत किंवा नाहीत. वचन 2,3 पहिला आधार, आणि वचन 6 दुसरा आधार आहे.

***4:1** *“कोणत्याही आत्म्यावर विश्वास”*- या जगात परमेश्वराचा आत्मा आहे आणि दुष्टात्में देखील आहेत. या दुष्टात्मा लोकांना चुकीचे सिद्धांत शिकवण्याकरता प्रेरित व उत्तेजित करतात. या दुष्टात्मा नकली व लबाड संदेष्टयांतूनही बोलू शकतात. पाहा 2 करिं 11:14-15; 1 तीम 4:1-3.आपण प्रत्येक शिक्षकावर भरंवसा ठेवू नये; म्हणजेच जे कोणी आपल्याला शिकवू इच्छितात त्यांच्यावर किंवा त्या आत्मा ज्या दुसऱ्या मनुष्यांतून/द्वारे शिकवू इच्छितात.

**“खोटे संदेष्टे”*- 2:18; 2 पेत्र 2:1शब्द ‘अनेक’ यावर लक्ष द्या.

***4:2-3** पाहा 2:22.

***4:3** *“स्वीकार करत नाही”*- उघड रूपाने त्या म्हणत नाहीत की येशू परमेश्वर आहे. त्या सत्याचा उलगडा देखील करत नाहीत. उघडपणे त्या हे सत्य कदाचित नाकारणारही नाहीत, पण त्याबरोबरच त्या स्वीकार न करण्याद्वारे दर्शवतात की त्यांचा याविषयी (बाबीवर) विश्वास नाहीये किंवा त्या या गोष्टीवर विश्वास करत नाहीत. धोकेबाज व खोटे शिक्षक ओळखले जाऊ शकतात - त्यांच्या शब्दांवरून आणि त्यांनी तोंड बंद (मुके) करण्यावरून.

**“देहधारण”*- योहान 1:14; इब्री 2:14खालील गोष्टींचा विरोध व नकार करणारा आत्मा : येशू देहाठायी आले, कुमारीकेपासून जन्मले, परमेश्वर व मनुष्याचा स्वभाव एक असणे - ही सर्व स्पष्ट व ठळक सत्यें आहे.

**“आधीच...आहे”*- 2 थेस्स 2:7शी तुलना - 4:4.

***4:4** *“जय मिळवला आहे’* - 2:13; 5:4. विश्वासी परमेश्वराचे निवडलेले आहेत. त्यांचे नवे आंतरिक जीवन, त्यांना परमेश्वरापासून मिळालेले आहे. ते खोटे शिक्षक ओळखून त्यांचे शिक्षण तिरस्कृत समजू शकतात, टाळू शकतात.

**“जो या जगात आहे”*- सैतान. परमेश्वराचा आत्मा या अशुद्ध आत्म्यांहून कितीतरी श्रेष्ठ व शक्तीमान आहे. म्हणूनच प्रियांनो, येशूंचे लोक (विश्वासी) सैतानावर विजय मिळवू शकतात - याकोब 4:7; इफि 6:10-13.

**“जो तुमच्यांत आहे”*- येशूंचा आत्मा - 3:24; रोम 8:9-10.

***4:5** *“ते”*- खोटे शिक्षक.

**“जगाचे”*- 2:15-16. खोटे संदेष्टे तेच शिकवतात जे उद्धार प्राप्त नसलेले व शारीरिक लोक ऐकण्याची इच्छा बाळगतात, म्हणून त्यांचा स्वीकार केला जातो - 2 तीम 4:3.

***4:6** ‘खरे व खोटे’ याविषयीची ही एक आवश्यक - अनिवार्य परीक्षा होय.

**“आपण”*- योहानाचा तात्पर्य येथे बायबल - शिक्षकांकरताचा आहे. येशूंचे खरे शिष्य (जे परमेश्वराला ओळखतात) त्यांचेच ऐकतात व येशूंचा, परमेश्वरी जणाच्या रूपात स्वीकार करून त्यांना प्रभु मानतात, तसेच शिकवणारेही, परमेश्वराच्या संतानांच्या रूपात त्यांचा स्वीकार करतात; या विपरित जे बायबलमधील दिलेले येशूंचे शिक्षण स्वीकारीत नाहीत, त्यांचा विचार काहीही असला तरी हेच सत्य आहे की ते परमेश्वरापासूनचे नाहीत.

***4:7-21** ही वचनें शिकवतात आणि दर्शवतात की प्रेम आहे तरी काय! 'प्रेम' शब्द या वचनात सुमारे 24 दा आलेला आहे. योहानाला म्हणावयाचे आहे की परमेश्वर प्रेम आहे, आपले प्रेम त्याने कार्यांत प्रगट केले, म्हणूनच आपणही कृतीद्वारे प्रेम दर्शवावे (3:18).

***4:7-8** *“प्रेम करावे”*- योहान 13:34.खऱ्या प्रेमाचा स्त्रोत (उगम) परमेश्वराठायी आहे, कारण विश्वासी परमेश्वरापासून जन्मले आहेत, म्हणून प्रेम करण्याबाबतीत त्यांनी परमेश्वरासारखे व्हावयास हवे, हे अलौकिक प्रेम होय (1 करिं 13:1). हेच अलौकिक प्रेम परमेश्वराठायी आहे व येशूंचा प्रभु म्हणून स्वीकार करणाऱ्या प्रत्येकाला तो ‘हेच’ प्रेम देतो (योहान 17:26). या जगात असे प्रेम

परमेश्वरापासून आहे आणि प्रत्येक जण जो प्रेम करतो, परमेश्वरापासून जन्मलेला आहे आणि परमेश्वराला ओळखतो. [8] जो प्रेम करत
नाही, तो परमेश्वराला ओळखत नाही, कारण परमेश्वर प्रेम आहे. [9] *परमेश्वराचे प्रेम यावरून प्रगट झाले, की परमेश्वराने आपला
एकुलता एक पुत्र या जगात पाठवला, जेणेकरून आपण त्यांच्याद्वारे जिवंत (जीवन प्राप्त करावे) रहावे. [10] प्रेम यांमध्ये नाहीये की
आपण परमेश्वर पित्यावर प्रेम केले, पण यांत आहे की त्याने आपल्यावर प्रेम केले आणि आपले अपराध खरवडून पुसण्यासाठी
आपल्या पुत्राला बलिदान* (अर्पण) म्हणून पाठवले. [11] *प्रिय मित्रहो, परमेश्वराने आपल्यावर एवढे प्रेम केले आहे,म्हणूनच आपणही
एकमेकांवर तेवढेच प्रेम करावयास हवे. [12] परमेश्वराला कोणीही पाहिलेले नाहीये*, पण जर आपण एकमेकांवर प्रेम केले तर जो
परमेश्वर आपल्याठायी राहतो*, त्याचे प्रेम आपल्याद्वारे पूर्ण प्रकारे* आपल्यात दिसले आहे. [13] *परमेश्वराने प्रमाण रूपाने आपला
आत्मा आपल्याला दिलेला आहे, जेणेकरून आम्ही त्याच्याठायी राहतो व तो आमच्याठायी वसतो (हे कळते); [14] *तसेच आम्ही
आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे आणि साक्ष देत आहोत, की पित्याने आपला पुत्र जगाचा उद्धारकर्ता* होण्यासाठी पाठवलेला
आहे. [15] जे लोक अशी घोषणा* (कबूली) करतात, की येशू परमेश्वराचे पुत्र* आहेत, त्यांच्याठायी परमेश्वर निवास करतो व ते
परमेश्वराठायी राहतात. [16] *आपल्याला ठाऊक आहे, की परमेश्वर आपल्यावर किती प्रेम करतो आणि आपण आपला भरंवसा
त्याच्यावर ठेवला आहे. परमेश्वर प्रेम आहे आणि ते सर्व लोक ज्यांच्या जीवनात प्रेम आहे, ते परमेश्वरामध्ये जीवन जगत आहेत

---

कोणाजवळही नाहीये. आपल्या मित्रांप्रत, पारिवारिक सदस्यांप्रत जे प्रेम असते, तसे हे प्रेम नाहीये. हे यौनाकर्षणाविषयीचे प्रेम नाहीये, या प्रेमात स्वार्थ नाहीये, हे प्रेम सेवा करणारे व चांगुलपणाचे कार्य करणारे प्रेम आहे. परमेश्वराने येशूंना पाठवले आणि हेच प्रेम दर्शवले. (वचन 9; रोम 5:8). लोकांनी खरोखर नवा जन्म प्राप्त केलेला आहे, याचे प्रमाण हेच आहे की तसेच अनाकलनीय आणि अवर्णनीय प्रेम त्यांच्याठायी असेलच. जर असे आहे तर ते खात्रीने दिसेलच. ‘जो प्रेम...ओळखत नाही”- परमेश्वरी ज्ञान बाळगण्याविषयी लोक अहंकार व गर्वाचा फुगा मिरवतात. पण जर त्यांच्याठायी परमेश्वरी प्रेम नाही, तर ते स्वतःला फसवत आहेत. त्यांचे अनेक अनुभव आणि विविध भावनाही असू शकतात पण जर ते ख्रिस्ती लोकांचा स्वीकार करू शकत नाहीत, तर सर्व सर्व काही केवळ ढोंग व लबाडी आहे. ‘परमेश्वर प्रेम आहे’ - वचन 16 देखील - हा अद्वितीय स्वभाव आहे.

***4:9-10** योहान 3:16; रोम 5:8; इफि 2:4-5.परमेश्वरच सर्व प्रेमाचे स्त्रोत आहे, मनुष्य नाही. जर प्रभूने, ते अलौकिक प्रेम दाखवले नसते, तर आपण कधीही अद्वितीय प्रेम ओळखले नसते. जर त्याचे प्रेम आपल्याठायी ओतले गेले नसते तर, आपणही त्याच्यावर तसेच प्रेम केले नसते.

***4:10** *“बलिदान”*- 2:2 चे नोट्स.

***4:11** परमेश्वर कोण आहे आणि विश्वासी कोण आहे! अर्थात महान परमेश्वराने जेवढे प्रेम आपल्यावर केले तेवढेच प्रेम आपण त्याच्यावर व विश्वासींवर करावे.

***4:12** *"परमेश्वराला...नाहीये”*- योहान 1:18; 1 तीम 6:16.

* *“परमेश्वर आपल्याठायी राहतो”*- योहान 14:23; रोम 8:9;उद्धार प्राप्त करणाऱ्यांसाठीच ही गोष्ट सत्य आहे (इफि 2:12; 4:18) या सत्याचे प्रमाण हेच आहे की आपसांत एकमेकांकरता प्रेम असते. जर परमेश्वर आपल्याठायी आहे, तर प्रेम आपल्या अंतःकरणात सामावलेले आहे. जर स्वर्गीक प्रेम आपल्या आत आहे, तर परमेश्वर आपल्याठायी आहे.

* *“त्याचे प्रेम...पूर्ण प्रकारे”*- हे एकमेकांवरील प्रेमाखातर आहे, पृथ्वी या स्वर्गीक प्रेमाने भरून जाऊ शकते.

***4:13** पाहा 3:24; योहान 17:21-23.

***4:14** पाहा 1:1-2.

* *“जगाचा उद्धारकर्ता”*- 2:2; योहान 4:42; 1 तीम 4:15.

***4:15** *“घोषणा”*- पाहा 1:9.तेथेही हाच शब्द येतो. येशूंचा, परमेश्वराचा पुत्र म्हणून स्वीकार करणे - अर्थात, आपण त्याच्यावर विश्वास ठेवून जे काही त्याने सांगितलेले आहे, तेच बोलावे. आपल्याला ठाऊक आहे की येशू परमेश्वराचे पुत्र आहेत कारण त्यांनी ते प्रगट केलेले आहे. आपल्याला ठाऊक आहे की हाच विश्वास आपल्याला परमेश्वरापर्यंत घेऊन जातो. हाच विश्वास आपले जीवन परमेश्वराशी जोडतो.

* *“परमेश्वराचे पुत्र”*- पाहा मत्त 3:17; योहान 3:16; 5:18-25.

***4:16** केवळ त्यांनी म्हटलेलेच नव्हे परंतु आपल्या प्रेमाचे प्रमाणही दिलेले आहे. वचन 1;3:16. प्रभूने आपल्या प्रेमाचे ठोस-सबळ प्रमाण आपल्याला दिले आहे, म्हणूनच आपणही कधी शंका करू नये. कशीही समस्या असो, कितीही संकटे किंवा कष्टें आलीत तरी आपण प्रेषितांच्या कथनावर व विश्वासींच्या विश्वासावर संदेह करू नये. आपण अशा प्रतिकूल परिस्थितीत प्रभूच्या प्रेमाचा आश्रय घेऊ शकतो. परमेश्वरी प्रेम आपल्याला कधीच सोडणार नाही - स्तो 23:6; रोम 8:35-39; 1 करिं 13:8.

आणि परमेश्वर त्यांच्यामध्ये. [17]ज्या रीतिने आपण परमेश्वराठायी राहतो आहोत.*, त्या रीतिनेच आपले प्रेम प्रत्येक दिवशी वृद्धींगत (वाढत) होत.* जाते आणि मग न्यायाच्या दिवशी.* आपण भिणार नाही; त्याच्यापुढे आपल्याला मोठ्या हिंमतीने.* उभे राहणे शक्य होईल कारण येथे या जगात आपण ख्रिस्तांसारखे आहोत. [18] *अशा प्रेमात कोणत्याही प्रकारची भीति नसतेच मुळी, कारण सिद्ध (परिपक्व) प्रेम, सर्व प्रकारचे भय काढून फेकते.*; जर आपण भीति बाळगत असू तर खचितच ती न्यायाच्या दिवसाची भीति आहे, यावरून प्रगट होते की त्याचे (परमेश्वराचे) प्रेम आपल्या जीवनात मूळावलेले (घट्ट पकडलेले) नाही. [19] *कारण परमेश्वराने पहिल्याने आपल्यावर प्रेम केले म्हणून आपण त्याच्यावर प्रेम करतो. [20] *जर कोणी म्हणतो, की “मी परमेश्वरावर प्रेम करतो, पण आपल्या ख्रिस्ती भाऊबहिणींचा द्वेष करतो, तर तो मनुष्य खोटे (लबाडी) बोलतो. आपण ज्या लोकांना डोळयांनी पाहतो, त्यांच्यावर प्रेम करीत नसू, तर आपण परमेश्वरावर प्रेम कसे करू शकतो, ज्याला आपण पाहिलेलेच नाहीये. [21] *स्वतः परमेश्वराने असा आदेश दिलेला आहे, की जो कोणी परमेश्वरावर प्रेम करतो, त्याने आपल्या ख्रिस्ती भाऊबहिणींवरही प्रेम करावे.

# 5

[1]जो व्यक्ती मान्य करतो की येशू हेच ख्रिस्त.* आहेत, तोच मनुष्य परमेश्वरापासून जन्मलेला.* आहे. प्रत्येक तो जो परमेश्वरावर प्रेम करतो, तो त्यांच्यावरही.* प्रेम करतो जे परमेश्वरापासून जन्मलेले आहेत. [2]ज्या समयी आपण परमेश्वरावर प्रेम करतो आणि

---

* **4:17** *“आपण...आहोत”*- योहान 17:14.परमेश्वर आपल्या मुलांचा व कन्यांचा न्याय, आपल्या स्वतःच्या संतानासारखाच करेल, अशी लेकरें, ज्यांच्याठायी त्याचे जीवन आणि प्रेम आहे.

* *“वृद्धींगत होते”*-- वचन 12.

* *“न्यायाच्या दिवशी”*- मत्त 10:15; 11:22,24; 2 करिं 5:10; 2 पेत्र 2:9; 3:7.

* *“हिंमतीने”*- 3:19,21; 2:28.

* **4:18** न्यायाचा विचार आपल्या मनात भय उत्पन्न करतो काय? तर मग, हे या गोष्टीचे प्रमाण आहे की आपण तसे प्रेम करत नाही जसे करावयास हवे. "सिद्ध” (परिपक्व) - असे प्रेम जे पूर्ण प्रकारे परिपक्व झालेले आहे, ज्या प्रेमाने सिद्धतेची उंची गाठलेली आहे. असे परिपक्व प्रेम आपण केवळ येशूंठायी पाहातो आणि तसेच ते आपल्याठायीही असावे (तुलना इफि 3:16-19). जेव्हा हे आपल्या आत असेल, तेव्हा आपण न्यायाविषयीचे भय बाळगणार नाही - पाहा 2 करिं 5:6-9; फिलि 1:21,23; 2 तीम 4:7-8.

* *“सर्व प्रकारचे...फेकते”*- येथे योहान परमेश्वरी भय याविषयी सांगत नाहीये. (अर्थात ते, जे परमेश्वराप्रत आदरयुक्त व सन्मानयुक्त भय आहे) होय, अशा आदर व सन्मानयुक्त भयाची नितांत आवश्यकता तर आहेच) (उत्प 20:11; ईयोब 28:28; स्तो 34:11-14; 86:11; 111:10; नीति 1:7) ,पण येथे योहान दंड व शिक्षेच्या भयाविषयी बोलतो आहे.

* **4:19** वचन 10. परमेश्वर स्वतः प्रगट करतात, प्रदर्शित करतात की खरे प्रेम काय आहे. याच प्रेमामुळे आपण त्यांचे संतान झालेलो आहोत आणि त्यांचे प्रेम आपल्या आत ओतले गेलेले आहे - तुलना रोम 5:5शी करा.

* **4:20** पाहा 2:9; 3:14-15.लोक असा अनुभव सुद्धा घेऊ शकतात की दुसऱ्यांवर प्रेम केल्यावाचूनही, ते परमेश्वरावर प्रेम करू शकतात, परंतु हे शंभर टक्के अशक्य आहे. जर आपण प्रभूवर प्रेम करतो, तर हे यासाठीच की, प्रभूचे अद्भुत विलक्षण प्रेम आपल्या आत ओतले गेलेले आहे, त्यामुळेच प्रेरणेने-स्फूर्तिने व प्रेरित होऊन आपण दुसऱ्यांवर प्रेम करू शकतो. आपले परमेश्वराप्रतचे प्रेम आणि त्यांनी निर्मिलेल्या लोकांप्रतचे प्रेम वेगळे आणि विभक्त केले जाऊ शकतच नाही. डोळयांनी दिसणाऱ्यावर प्रेम करणे कठीण जात असेल तर अदृश्य परमेश्वरावर आपण प्रेम करणार काय?

* **4:21** जी बाब परमेश्वराच्या दृष्टीने आपल्या आंतरिक गरजेची आहे, तेच करण्याची तो आपल्याला आज्ञा देतो. तो त्या प्रेमाविषयी बोलत आहे जे कार्यांतून /द्वारे दिसते (3:16-18).

* **5:1** *“येशू हेच ख्रिस्त”*- 2:22; 3:23; 4:2. हे मान्य करणे की येशू 'ख्रिस्त' (सोडवणारे) आहेत, म्हणजे असे स्वीकार करणे की रचनाकार परमेश्वराचे, येशूंविषयीचे जे मत आहे, ते स्वीकार करून त्यावर विश्वास ठेवणे होय. जेव्हा खरोखर आपण मान्य करतो की येशू 'मशीहा' आहेत तेव्हा ते आपल्याकरताचे ‘एक स्वर्गीक बक्षिस’ ठरते (फिलि 1:29; इफि 2:8-9), ज्याला हे सत्य मिळाले आहे त्याच्यावर याचा एक हमखास प्रभाव होईल. (तुलना - प्रेषि 2:36-42). हे सत्य आहे की मुखाने अंगिकार करणे की येशू उद्धारकर्ता आहेत आणि अंतःकरणाने विश्वास न करणे यांत आकाश पृथ्वीचे अंतर आहे आणि त्याचा कोणताही फायदा नाहीये.

* *“परमेश्वरापासून जन्मलेला”*- 2:29; योहान 1:12-13.

* *“त्यांच्यावरही”*- जर आपण जगाच्या स्वामींवर प्रेम करत असू तर परमेश्वराच्या (त्याच्या) मुलांमुलींशीही प्रेमाचाच व्यवहार करू

त्याच्या आज्ञा पाळतो त्यावरूनच सिद्ध होते की* आपण परमेश्वराच्या मुलांमुलींवर प्रेम करतो. [3] *परमेश्वराच्या आज्ञा पाळणे म्हणजे
परमेश्वरावर प्रेम करणे होय आणि परमेश्वराच्या आज्ञा ओझे* नाहीत. [4] *जो मनुष्य परमेश्वरापासून जन्मलेला आहे, तो जगावर विजय
मिळवतो आणि जगावर जय मिळवणारा आहे, 'आपला विश्वास'. [5] *कोण आहे जो जगावर विजय मिळवतो? तोच ज्याने मान्य
केलेले* आहे, की येशू परमेश्वराचे पुत्र (देहधारण करणारा परमेश्वर) आहेत. [6] *हे तेच आहेत ज्यांचे येणे 'पाणी' व 'रक्ताने' झाले,
केवळ पाण्याने नव्हे, परंतु पाणी व रक्ताने. या गोष्टीविषयी पवित्र आत्मा साक्ष देतो*, कारण हा आत्मा सत्य आहे. [7] *स्वर्गात तीन
आहेत, जे साक्ष देतात - पिता, त्याचे वचन - (येशू) आणि पवित्र आत्मा. हे तिघे एक आहेत. [8] *या पृथ्वीवरही तीन आहेत जे साक्ष
देतात : पवित्र आत्मा, पाणी व रक्त (येशू ख्रिस्तांचे बलिदान). हे तिघे देखील एक आहेत. [9]जर आपण लोकांची साक्ष* मान्य
करतो, तर परमेश्वराची साक्ष* आपण का मानू नये, त्याची साक्ष तर मोठी आहे, कारण परमेश्वराने आपल्या पुत्राविषयी साक्ष दिलेली

---

(4:20).

***5:2** *"सिद्ध होते की"*- आपल्या मनात परमेश्वराच्या लोकांचे साहाय्य करण्यासाठीच्या उत्तम भावना आहेत, ही गोष्ट सिद्ध व प्रमाणित करत नाही काय की आपण परमेश्वरावर प्रेम करतो. बायबलच्या वचनांवर भरंवसा न ठेवून केवळ भावनात्मक झाल्याने काम चालणार नाही. प्रेम आणि आज्ञापालन हे एकमेकांसोबत चालत असतात. जर आपण हृदयाने प्रभूच्या आदेशांचे पालन करत असू, तर आपण परमेश्वराच्या लोकांवर (संतान) प्रेम करतो, या गोष्टीची 100: खात्री आहे.

***5:3** योहान 17:15,21,23.

* *"ओझे"*- तुलना मत्त 11:29-30. प्रभूच्या लोकांत नवा स्वभाव आहे, म्हणून परमेश्वरी आज्ञा, त्यांच्याकरता एखादे ओझे नाहीच मुळी, नवा स्वभाव परमेश्वरावर प्रेम करतो (4:12).

***5:4** "जो मनुष्य" -अर्थात कोणीही जो विजय मिळवतो 2:13-14; 4:4.येशूंचे पहिले शिष्य, या जगाची शैली व रीतिविधी आणि अपराध सोडून जेव्हा येशूंजवळ विश्वासाने आले, तेव्हा त्या विश्वासाद्वारे ते या जगावर विजय मिळवू लागले होते. ज्या क्षणी असे झाले, त्यांनी जगावर विजय मिळवला. येशूंचे शिष्य व लोक, ख्रिस्तांवर निरंतर विश्वास करण्याद्वारे, लागोपाठ विजय मिळवत जातात. प्रभूचे हे विश्वासी, जगिकपणाच्या गोष्टींपासून बाहेर करण्यात आले आहेत आणि त्यांना 'विशेष लोक' होण्याकरता वेगळे केले आहे (योहान 17:6; 14:16). विश्वास म्हणजे या जगावर जय मिळवणे, कारण हा विश्वास आपल्याला ख्रिस्तांशी बांधतो; 'विश्वास-बंधनात' असणारे येशूंचे लोक जगावर जय मिळवणारे सर्वश्रेष्ठ व विजयी असे आहेत (योहान 16:33).

***5:5** पाहा 4:15.

* *"ज्याने मान्य केलेले"*- लोकांचा, या जगात वावरतांना हा प्रयत्न असतो की त्यांनी सन्यासवादाने किंवा समाजापासून दूर राहून - जगावर विजय मिळवावा; असा प्रयत्न म्हणजे जिंकणे नव्हे. याचा काहीही फायदा नाहीये. जे लोक ही पद्धत स्वीकारतात, त्यांच्या मनात संसारिकता कायमच असते - पाहा विजय मिळवणे - प्रक.2:7.

***5:6** मत्त 3:13-17; 26:28; योहान 19:34. बायबलमध्ये बहुधा, 'पाणी' आंतरिक जीवन किंवा पवित्र आत्म्याकडे केलेला इशारा आहे (योहान 4:10; 7:38-39). रक्त, अपराधांच्या क्षमेकरता, बलिदानाकडे संकेत करते आणि बलिदान हा क्षमेचा एक आधार आहे (1:7; इफि 1:7). ख्रिस्त परमेश्वराच्या आत्म्यापासून जन्मले होते; आत्म्याने त्यांचा अभिषेक झालेला होता आणि ते आत्म्याने परिपूर्ण देखील होते, म्हणूनच ते इतरांसाठी प्रेरणा देणारे होते. आपल्या अपराधांच्या क्षमेसाठी, कुर्बान होऊन त्यांनी पृथ्वीवरील आपली सेवा संपवली.

* *"पवित्र आत्मा...देतो"*- कारण आत्मा सत्य आहे - योहान 14:6,17; स्तो 31:5; तीताला 1:2.

***5:7-8** या वचनांचा एक भाग : स्वर्गात पिता, वचन व पवित्र आत्मा हे तिन्ही एक आहे. तीन आहे, जे या पृथ्वीवर साक्ष देतात - प्रारंभीच्या ग्रीक पाडुंलिपीत याविषयी नाहीये, हे प्रसिद्ध लॅटिन भाषांतरात आहे. 16व्या शताब्दीत, एका ज्ञानवंताने म्हणजे इरास्मस याने ही वचनें, ग्रीक लेखात जोडली आणि ती प्रकाशित केली होती. म्हणून त्यांचा उल्लेख किंग जेम्स अनुवादात आहे. मूळ ग्रीक पांडुलिपीत याचा समावेश नव्हता हे शक्य आहे.

***5:8** ख्रिस्त येशूंच्या जीवनमरणाचे सत्य लिहिलेले (लेखी स्वरूप) आहे आणि साक्ष रूपात आहे. परमेश्वराचा आत्मा, आपल्याला त्याच्याविषयी सुद्धा सांगतो. तीन सहमत आहेत, संपूर्ण प्रकारे: जो आंतरिक साक्षीदार म्हणतो, तीच साक्ष बाहेरचाही देतो. विश्वासींचा अनुभव आणि बायबल या दोन्हीत तालमेल आहे.

***5:9** *"लोकांची साक्ष"*- योहान 8:17शी तुलना. लोकांचे ऐकून आपण विश्वास करतो, म्हणून काय आपण परमेश्वरापेक्षाही श्रेष्ठ आहोत व त्याचे ऐकू नये? पाणी, रक्त व पवित्र आत्मा (वचन 6,8) येशूंचे परमेश्वरी साक्षीदार आहेत.

* *"परमेश्वराची साक्ष"*- योहान 5:36-37शी तुलना व योहान 8:18शी देखील. आपल्याजवळ जो नवा करार आहे, त्यात ही साक्ष

आहे. [10] *जो कोणी परमेश्वराच्या पुत्रावर भरंवसा ठेवतो, त्याच्या अंतःकरणातच एक साक्ष आहे. जो परमेश्वरावर भरंवसा ठेवत
नाही, त्याला परमेश्वर लबाड * ठरवतो, कारण त्याने परमेश्वराच्या पुत्राविषयी दिलेल्या साक्षीवर विश्वास ठेवला नाही. [11] साक्ष ही
आहे : परमेश्वराने आपल्याला अनंत जीवन * दिलेले आहे आणि हे जीवन त्याच्या पुत्राठायी * आहे. [12] ज्याच्याजवळ पुत्र आहे,
त्याच्याजवळ अनंत जीवन * आहे आणि ज्याच्याजवळ पुत्र नाही, त्याच्याठायी जीवनही नाही. [13] *तुम्ही ज्या सर्वांनी, परमेश्वराच्या
पुत्राच्या नांवावर विश्वास ठेवलेला आहे त्या तुम्हांला, मी या गोष्टी लिहिल्या आहेत ते अशासाठी की तुम्हांला अनंत जीवन
मिळालेलेच आहे हे कळावे. [14] *येशूंच्या संबंधाने आपल्याला असे धैर्य लाभलेले आहे, की जर आपण त्यांच्या योजनेनुसार (इच्छा)
काही मागितले तर ते आपले ऐकतात. [15] जर आपल्याला ठाऊक आहे, की जी काही आपली विनंती असते, ते ऐकतात तर
आपल्याला हे देखील ठाऊक आहे, की जे काही आपण मागितलेले आहे आपल्याला मिळालेलेच आहे. [16] *जर एखाद्याने आपल्या
भावाला असा गुन्हा करताना पाहिले, ज्याचा परिणाम मरण नाहीये * तर त्याने प्रार्थना करावी आणि प्रभु त्याला जीवन देईल. पण
असा अपराध देखील आहे, जो थेट मरणापर्यंत नेतो, त्याविषयी मी म्हणत नाही की अशा प्रकारचा अपराध करणाऱ्याकरता प्रार्थना

---

आहे. खरोखर आपण म्हणू शकतो की संपूर्ण बायबल, परमेश्वराने ख्रिस्तांविषयी दिलेली साक्षच आहे.

***5:10*** जेव्हा आपण येशूंचा स्वीकार करतो तेव्हा आपले अंतःकरण गंभीर होते आणि गांभीर्याने स्वीकार करते, की येशूंविषयी लिहिलेले सर्व सत्य व केवळ सत्यच आहे. प्रियांनो हे ‘गांभीर्याने स्वीकारणे’ केवळ परमेश्वराच्या आत्म्याच्या साहाय्यानेच होते.

* *“लबाड”*- 1:10. परमेश्वराने जे म्हटले त्यावर विश्वास न करणे म्हणजे परमेश्वराचा अनादर व अपमान करणे होय.

***5:11*** *“अनंत जीवन”*- योहान 3:16,36; 6:47; 17:2.

* *“त्याच्या पुत्राठायी”*- वचन 20; 1:2; योहान 11:25-26; 14:6; कल 3:4.

***5:12*** *“अनंत जीवन”*- आंतरिक जीवन केवळ आणि केवळ ‘एक मनुष्य’ अर्थात येशूंठायीच आहे. जर आपल्याजवळ येशू नाहीत तर आपण आंतरिक रीतिने मेलेले आहोत (इफि 4:18), आणि इतर कोणत्याही मार्गाने किंवा व्यक्तिद्वारे आपण ते आंतरिक जीवन परमेश्वरातर्फे मिळवू शकत नाही. (योहान 3:36). जर आपण ‘त्या विशेष मनुष्याचा’ आणि ‘उगमस्थानाचा’ नकार केला, अस्वीकार केला, तर कशा प्रकारे आपण आंतरिक जीवन मिळवण्याची अपेक्षा सुद्धा करावी?

***5:13*** प्रभूची इच्छा ही नाहीये की ख्रिस्तांच्या उद्धाराविषयीची लोकांनी शंका करावी, त्यांच्याजवळ उद्धार आहे आणि त्यांनी भरंवसा ठेवावाच; याच एका कारणास्तव योहानाला प्रेरणा मिळाली की त्याने हे पत्र लिहावे. विश्वासी कसे मान्य करू शकतात की त्यांनी उद्धार मिळवलेला आहेच? योहान कोणती चिन्हें दाखवतो? : उद्धाराची पुरेपूर खात्री बायबलमध्ये परमेश्वराच्या साक्षीवर विश्वास केल्याने (9,11) ,पवित्र आत्म्याच्या आंतरिक साक्षीने (वचन 10; 3:24), अपराधांच्या क्षमेच्या प्रतिज्ञेवर विश्वास ठेवल्याने (1:7-9), परमेश्वराप्रत आज्ञापालनाच्या प्रमाणाद्वारे (2:5; 5:2), योग्य व न्याय्य जीवनाच्या प्रमाणावर (2:29; 3:6,10), आपल्या जीवनात असलेल्या प्रेमाच्या फळांच्या प्रमाणाद्वारे (3:14,18,19; 4:12). योहान सत्याचे कथन पुढे मांडतो ज्यामुळे विश्वासींना आश्वासन मिळते (4:15; 5:1). उद्धाराचे संपूर्ण आश्वासन व हमी तीन बाबींवर अवलंबून आहेत:1 लेखी (लिहिले गेलेले) बायबल व - विश्वासींनी घेतलेला आंतरिक अनुभव 2त्यांचे बाह्य जीवन - वर्तणूक - व्यवहार 3 आणि सरतेशेवटी प्रेम.

***5:14-15*** येशूंच्या शिष्यांजवळ अनंत जीवन असल्यामुळे ते परमेश्वराशी सहभागिता करण्याचे धैर्य (हिंमत) करू शकतात (तुलना रोम 5:2; इफि 2:18; 3:12; इब्री 4:16; 10:19-22). आपला भरंवसा असा आहे की परमेश्वर त्यांच्या विनंत्यांची उत्तरे देतो, ज्या त्याच्या इच्छेनुसार आहेत. आपल्या इच्छेने काही मागणे ही वेगळी गोष्ट आहे. अशा प्रार्थनेच्या उत्तराची अपेक्षा केली जाऊ नये. मत्त 6:10ही प्रत्येकाच्या अंतःकरणाची कामना असावी, परंतु प्रभुला काय हवे, त्याची इच्छा काय आहे, हे सर्व बायबल आपल्याला शिकवते. जर परमेश्वराच्या वचनांची, ‘बायबलची’ आपल्याला जाण नाही, ज्ञान नाही तर आपल्याला परमेश्वराची इच्छा कळू शकणार नाहीच मुळी.

***5:16*** जे लोक दुष्टाईत आहेत, त्यांच्यासाठी आपण प्रार्थना करावयास हवी. तुलना याकोब 5:16.

* *“मरण नाहीये”*- काही गुन्हे मरण का बरे आणत नाहीत? कारण परमेश्वर ते क्षमा करतो आणि तो गुन्हा मान्य केला तर त्याची पूर्णपणे क्षमा मिळेल (1:9). असे कोणते अपराध आहेत जे मनुष्याला थेट मरणापर्यंत घेऊन जातात? योहान त्याविषयी आपल्याला काहीही सांगत नाही म्हणून आपण अंदाज लावू नये, किंवा योग्य कारण सांगू शकत नाही. कदाचित, एक असा अपराध, जो प्रभु क्षमा करणार नाही, असा अर्थ होऊ शकतो. पाहा - मत्त 12:31-32; इब्री 2:3; 6:4-6; 10:26-31; 12:25 जे लोक जाणूनबुजून ख्रिस्तांचा त्याग करतात, त्यांची वार्ता त्यागतात आणि परमेश्वराला कोणतीही संधीच देत नाहीत की त्याने, त्यांना क्षमा करावी. योहान असे म्हणत नाहीये की विश्वासी असे काही करू शकतात. खरे पाहिल्यास 3:6,9हेच शिकवते की ते असे काही करू शकतच नाहीत.

केली जावी. 17 [*]प्रत्येक प्रकारची दुष्टाई, अपराध आहे!असा गुन्हा सुद्धा आहे ज्याचा दंड मरण नाहीये . 18 आपल्याला ठाऊक आहे
की जो परमेश्वरापासून जन्मलेला आहे, तो अपराध करणे कायम ठेवत नाही[*], परंतु तो जो परमेश्वरापासून जन्मला आहे, अपराध
करण्यापासून स्वतःला राखतो, आणि अशा मनुष्याला सैतान स्पर्श देखील[*] करू शकत नाही. 19 आपल्याला ठाऊक[*] आहे की
आपण परमेश्वराचे आहोत आणि सर्व जग त्या दुष्टाच्या तावडीत आहे. 20 आपल्याला ठाऊक आहे, की परमेश्वराचा पुत्र, येशू
येऊन चुकला आहे (आलेले), आणि परमेश्वराने आपल्याला अशी बुद्धि (समज) दिलेली आहे जेणेकरून आपण येशू जे सत्य[*]
आहेत त्यांना स्वीकारावे[*]. त्यांचा पुत्र येशू ख्रिस्त जे सत्य आहेत, आपण त्यांच्याठायीच[*] आहोत. येशू सत्य परमेश्वर आणि अनंत
जीवन आहेत. 21 लहान बाळांनो, स्वतःला मूर्तीपासून[*] वाचवा. होय, असेच होवो.

---

[*]**5:17** "असा गुन्हा.....मरण नाहीये" -पाहा 3:4. हे सत्य आहे म्हणून आपण आणखी अधिक अपराध करण्याकरता प्रेरित होऊ नये आणि या सत्याने आपल्याला तसे करावयाची प्रेरणा देऊ नये, आपला कल त्या दिशेने वळता कामा नये. पण, त्यामुळे ही आशा खात्रीपूर्वक मिळते की समजा ,जर असा गुन्हा घडलाच तरीही आपल्याला क्षमा मिळू शकते.

[*]**5:18** *“अपराध करणे...ठेवत नाही”*- 3:6. या वचनाचे अनेक अनुवादक असा विश्वास करतात की 'जो परमेश्वरापासून जन्मलेला आहे.' हा इशारा कोणत्याही विश्वासीकडचा आहे, आणि 'जो परमेश्वरापासून जन्मला आहे' हा येशूंकडे केलेला संकेत आहे. येशूंचा जन्म कुमारी मरीयेद्वारे झाला होता. (मत्त 1:21; लूक 1:35; गल 4:4). येशूंचे मरणानंतर झालेले पुनरूत्थान (पुन्हा जिवंत उठणे) एका जन्मासारखेच होते (प्रेषि 13:33; इब्री 1:5), आणि अनंतकाळापासून येशूंचे जे जीवन होते ते परमेश्वरापासूनच होते (योहान 5:26).

[*]*“स्पर्श देखील”*- म्हणजे ख्रिस्त. आणि म्हणून सैतानाचा हात येशूंच्या विश्वासीवर असूच शकत नाही. येशू त्याच्या आत आहेत, येशू सैतानापेक्षा कितीतरी पटीने अधिक बलवान आहेत (4:4; योहान 10:28; रोम 5:9-10).

[*]**5:19** *“ठाऊक”*- या पत्राद्वारे पाहा की योहानानुसार, एका विश्वासीला काय काय ठाऊक आहे - 2:5,20; 3:2,5,14,16,19,24; 4:16; 5:13,15,18,20. “दुष्टाच्या” पाहा योहान 14:30; 2 करिं 4:4; इफि 2:2; 2 तीम 2:26. याच सर्व कारणांमुळे हे जग दुष्टाईने ओतप्रोत झालेले आहे.

**5:20** *“ठाऊक आहे, की”*- तुलना लूक 24:45; 1 करिं 2:12,16.

[*]*“सत्य”*- हा शब्द येशूंकरता आहे. फिलि 2:6; लूक 11:25.येशू अनंत जीवन देखील आहेत (वचन 11; योहान 11:25; 14:6). केवळ परमेश्वरासाठीच असे म्हणता येते की तो अनंतकाळासाठी आहे.

[*]*“स्वीकारावे”*- मत्त 11:27.हीच केवळ एकमेव पद्धत आहे, मार्ग आहे, परमेश्वराचे सत्य ज्ञान मिळवण्याचे.

[*]*“त्यांच्याठायीच”*- योहान 17:21-23; 1 करिं 12:12-13; इफि 1:3-4.जग दुष्टाठायी (सैतानाच्या तावडीत) आहे, विश्वासी ख्रिस्तांठायी आहे.

[*]**5:21** *“मूर्तीपासून”*- योहानाने सत्य परमेश्वराविषयी सांगितलेले आहे. म्हणून त्याच्या डोक्यात, खोटया ईश्वरांविषयीचा विचार आला. मनुष्य, ‘ज्या कोणाची’ आराधना करतो, सेवा करतो, परंतु ‘जो कोणी’ जर सत्य परमेश्वर नसेल, तर ती मूर्तीपूजाच आहे आणि तो कोणीतरी ‘मूर्ति’ आहे. एखादी मूर्ति, एखाद्या भौतिक वस्तुने तयार केलेली (घडवली) असू शकते; किंवा परमेश्वर कसा आहे याविषयीची ती एक खोटी कल्पना, खोटा विचारही असू शकतो. प्रियांनो शेवटी सारांश हाच आहे, की आपण जे ख्रिस्तांचे विश्वासी आहोत, त्या प्रत्येकाने स्वतःला कोणत्याही प्रकारच्या मूर्तीपूजेपासून राखावे (सावध असावे).